# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## ‘ई-२०’मुळे मायलेजमध्ये ५ टक्क्यांपर्यंत घट; पेट्रोलियम मंत्रालयाची कबुली

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- इथेनॉलचे २० टक्के मिश्रण असलेले ई-२० पेट्रोल वापरल्याने काही वाहनांच्या मायलेजमध्ये ३ ते ५ टक्के घट होऊ शकते, अशी कबुली पेट्रोलियम मंत्रालयाने शुक्रवारी दिली. दरम्यान, या इंधनाचे फायदे अधिक असून, ते ऊर्जा सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहे, असेही मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रमाबाबत पेट्रोलियम मंत्रालयाने प्रश्न-उत्तर स्वरूपात माहिती प्रसिद्ध केली आहे. यानुसार, ई-१० अथवा शुद्ध पेट्रोलपेक्षा ई-२० पेट्रोल हे अधिक स्वच्छ, उच्च गुणवत्ता असलेले आणि अधिक कार्यक्षम इंधन आहे. अनेक वर्षांच्या शास्त्रीय चाचण्यांनंतर हे इंधन वितरणात आणण्यात आले आहे. यासाठी आधी वाहन निर्मिती कंपन्यांशी चर्चा करण्यात आली होती. देशांतर्गत इथेनॉल निर्मितीचा विस्तारही करण्यात आला आहे. इथेनॉल मिश्रणाचा पथदर्शी प्रकल्प २००१ मध्ये राबविण्यात आला. त्यानंतर २००६ मध्ये देशात ५ टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलचा वापर सुरू करण्यात आला.

देशात २०१४ पर्यंत पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण सुमारे १.५ टक्के होते. सरकारने राष्ट्रीय जैवइंधन धोरण २०१८ मध्ये आणून त्याला गती दिली. याचबरोबर ऊसापलिकडे इतर पिकांचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी सुरू करण्यात आला. भारताने २०२२ मध्ये पेट्रोलमध्ये १० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट गाठले. या वर्षात आता २० टक्के इथेनॉल मिश्रणाच्या उद्दिष्टापर्यंत आपण पोहोचलो आहोत. देशात इथेनॉल निर्मिती प्रकल्प, साठवणूक आणि वाहतूक यात मोठी गुंतवणूक करण्यात आल्याने आता मागणीपेक्षा इथेनॉलचा पुरवठा जास्त आहे, असे पेट्रोलियम मंत्रालयाने म्हटले आहे.


(वर्ष ६५ वे अंक १७७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.११ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# सर्व शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी मिळणार

## ५० हजारांची अट रद्द, ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ; मुख्यमंत्र्यांची सभागृहात घोषणा

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- राज्यातील बळीराजासाठी राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक घोषणा केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दिली जाणारी ५० हजार रुपये भरण्याची जाचक अट सरकारने पूर्णपणे काढून टाकली आहे. यामुळे राज्यातील तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी मिळणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

विरोधकांकडून या कर्जमाफी योजनेवर होत असलेल्या टीकेला फडणवीस यांनी आकडेवारीसह सडेतोड उत्तर दिले. “या योजनेमुळे केवळ ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल आणि १२-१३ हजार कोटींचाच लाभ मिळेल, हा दावा पूर्णपणे चुकीचा आहे. राष्ट्रीयकृत, व्यापारी आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून गोळा केलेल्या अचूक डेटानुसार, ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळवून देणारी ऐतिहासिक योजना आहे,“ असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

कर्जमाफीबाबत अभ्यास करण्यासाठी सरकारने प्रवीण परदेशी समिती स्थापन केली होती. वारंवार कर्जमाफी दिल्यास शेतकरी कर्ज भरणे थांबवतील आणि बँकिंग व्यवस्था कोलमडेल, अशी भीती या समितीने व्यक्त केली होती. त्यामुळे मागील योजनेत लाभ घेतलेल्यांना पुन्हा कर्जमाफी देताना काही रक्कम (उदा. ५० हजार) भरण्याची अट सुचवली होती. मात्र, महायुतीच्या सर्व आमदारांनी ही ५० हजारांची अट रद्द करण्याची जोरदार मागणी लावून धरली.

“शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्यांवर बरीच चर्चा झाली. कर्जमाफी ही परिस्थितीची आवश्यकता आहे म्हणून आपण करतो. कुठल्याही कर्जमाफीने शेतकरी कधी श्रीमंत झाला नाही किंवा होऊ शकत नाही. मात्र, त्या-त्यावेळी शेतकऱ्यांना क्रेडिटवरती बनवायचं, जेणेकरून शेतकऱ्याला सावकाराकडे जावं लागणार नाही, हे त्यामागचं एक उद्दिष्ट असतं. मी पुन्हा एकदा सांगतो की आम्ही विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी शब्द दिला होता की आम्ही कर्जमाफी करू. खरं तर कर्जमाफी देण्यासाठी २०२९ पर्यंत आम्ही थांबू शकलो असतो. कारण आम्ही सर्व निवडणुका जिंकलो आहोत. मात्र,



आम्ही तसं केलं नाही. आम्ही ठरवलं की शेतकरी अडचणीत असेल तर शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली पाहिजे. त्यामुळे आपल्या सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतला”, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

“सरकारने काय काय केलं? तर कर्जमाफीच्या व्यतिरिक्त दरवर्षी २५ हजार कोटी रुपये वीजमाफी सरकार देतं. हे पैसे भरावे लागतात. पहिल्या वर्षी २० हजार कोटी, दुसऱ्या वर्षी २२ हजार कोटी आणि तिसऱ्या वर्षी २५ हजार कोटी रुपये आपण भरतो. आता कर्जमाफीचा निर्णय घेताना सर्व बँकांची बैठक घेतली आणि त्यानंतर ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना’ आपण जाहीर केली. या माध्यमातून ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटींचा लाभ देणारी ही कर्जमाफी योजना आहे”, असंही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

ही अट काढल्यास तिजोरीवर ३ ते ४ हजार कोटींचा अतिरिक्त भुर्दंड पडेल आणि दोन लाख शेतकरी लाभापासून वंचित राहतील, हे माहीत असूनही व्यापक हिताचा विचार करून सरकारने ही अट मागे घेण्याचा निर्णय घेतला. तसेच, जुन्या (२६-२७) अटीही वगळण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

आधीच्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील त्रुटी दूर करून सरकारने ही नवी योजना अधिक लवचिक बनवली आहे. आधीच्या योजनेत शेतकऱ्याची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा केवळ १ रुपया जरी जास्त असली, तरी त्याला कर्जमाफीचा लाभ मिळत नव्हता. मात्र, अहिल्यादेवी होळकर योजना या नव्या योजनेत ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांनाही सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच, महात्मा फुले योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांनाही या नव्या योजनेत सामावून घेतले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## युद्ध अजून संपलेले नाही, आमची तयारी; इस्त्रायलचा इराणला इशारा

वॉशिंग्टन दि.१० (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराण यांच्यात नव्याने संघर्षाची ठिणगी पडली असताना आता इस्त्रायलने इराणला इशारा दिला आहे. “युद्ध अद्याप संपले नाही”, असे इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी इराणला इशारा देताना म्हटले आहे. इस्त्रायल आवश्यक कारवाईसाठी तयारी करत असल्याचेही नेतान्याहू यांनी स्पष्ट केले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा हल्ले सुरु झाले असताना इस्त्रायलने नव्याने दिलेल्या धमकीमुळे मध्य पूर्वेत युद्धाचे ढग पुन्हा गडद होऊ लागले आहेत.

इस्त्रायली हवाई दलाच्या पदवीदान समारंभात बिन्यामिन नेतान्याहू गुरुवारी बोलत होते. इस्त्रायली हवाई दलाच्या क्षमता देशाच्या सुरक्षेसाठी महत्वाच्या असल्याचे नेतान्याहू यांनी यावेळी नमूद केले. “इराणी नेतृत्व वारंवार भूमिका बदलून धक्का देण्याचा प्रयत्न करत आहे. पण, आमचे धोरण स्पष्ट आहे की, इराणकडे कधीच अण्वस्त्र असणार नाही. मग करार होऊ किंवा नाही. आम्ही ठोस पावले उचलली नाही तर इराण अण्वस्त्र तयार करु शकते. युद्ध अद्याप समाप्त झालेले नाही. आणि नवीन आव्हानं आपल्यासमोर उभी राहत आहेत”, असे या समारंभात बोलताना नेतान्याहू म्हणाल्याचे इस्त्रायली माध्यमांनी म्हटले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी देखील इराणबरोबरची शस्त्रसंधी समाप्त झाल्याची घोषणा करत आता चर्चेला वाव उरला नसल्याचे स्पष्ट केले. चर्चा म्हणजे ‘वेस्ट ऑफ टाईम’ असल्याचे मत ट्रम्प यांनी व्यक्त केले. त्यानंतर आता इस्त्रायलच्या नेतान्याहू यांनी इराणाला धमकी वजा इशारा दिला असून, मध्य पूर्वेत पुन्हा एकदा युद्धाचे सावट गडद झाले आहे. अमेरिकेने इराणच्या जवळपास ८० ठिकाणांवर हल्ले केल्यानंतर इराणने देखील अमेरिकेच्या बहारीन आणि कुवेत येथील अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य केले आहे, असे वृत्त आंतरराष्ट्रीय माध्यमांनी प्रसिद्ध केले आहे.

दरम्यान कतारने अमेरिका आणि इराणला सामंजस्य कराराचे (एमओयू) पालन करण्याचे आणि तणाव वाढू नये यासाठी चर्चा सुरू ठेवण्याचे आवाहन केले आहे. कतारचे पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री शेख मोहम्मद बिन अब्दुल रहमान बिन जासिम अल थानी यांनी सांगितले की, त्यांनी इजिप्तचे परराष्ट्र मंत्री बद्र अब्देलती यांच्याशी दूरध्वनीवरून झालेल्या संभाषणादरम्यान हा मुद्दा उपस्थित केला.

त्यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून निर्बाध जल वाहतूक कायम ठेवण्याच्या गरजेवरही भर दिला आणि सांगितले की, या महत्त्वपूर्ण सागरी मार्गातून सुरक्षित जल वाहतूक ही प्रदेशाच्या सुरक्षिततेसाठी आणि स्थिरतेसाठी आवश्यक आहे.

### हल्ला केल्यास इस्त्रायल वाचणार नाही; इराणचेही प्रत्युत्तर

इराणने इशारा दिला आहे की, त्यांच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर कोणताही हल्ला झाल्यास प्रत्युत्तरादाखल हल्ला केला जाईल आणि इस्त्रायललाही सोडले जाणार नाही. सरकारी माध्यमांनुसार, इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव मोहम्मद बागेर झोलघदजार यांनी शुक्रवारी हा इशारा दिला.

दरम्यान, इराणचे नवीन सर्वोच्च नेते, मोज्तबा खामेनी, शनिवारी पहिल्यांदाच सार्वजनिकरित्या दिसण्याची शक्यता आहे. इराणच्या तस्निम वृत्तसंस्थेनुसार, ते कोम शहरातील हजरत मासुमेह दर्ग्यात त्यांचे वडील, माजी सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या अंत्यविधीचे नेतृत्व करतील.

## शेख हसीना बांगलादेशात परतणार, जीवाला धोका असल्याचा दावा

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना ऑगस्ट २०२४ मध्ये पदावरून पदच्यूत करण्यात आले होते. तेव्हापासून त्यांनी भारतात आश्रय घेतला. आता त्यांनी बांगलादेशमध्ये परतण्याचे संकेत दिले आहेत. डिसेंबरमध्ये बांगलादेशमध्ये परतणार असल्याचे त्या म्हणाल्या. “ते मला अटक करू शकतात. माझी हत्याही करू शकतात. पण तरीही मी परतणार आहे”, असे म्हणत शेख हसीना यांनी डिसेंबरमध्ये न्यायालयाला शरण जाणार असल्याचे सांगितले.

रॉयटर्स या वृत्तसंस्थेला फोनद्वारे दिलेल्या मुलाखतीत शेख हसीना यांनी हा दावा केला. मायदेशात माझ्या मृत्यूचा धोका आहे. पण तरीही आता देशात परतण्याची वेळ आली आहे, असे त्या म्हणाल्या. अवामी लीगचे अनेक नेते आणि त्या स्वतः मायदेशात परतणार असून न्यायालयासमोर उभे राहणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

बांगलादेशच्या एका न्यायालयाने शेख हसीना यांना फाशीची शिक्षा सुनावलेली आहे. यावर बोलताना त्या भावुक होत म्हणाल्या, जर माझा मृत्यू होणारच असेल तर तो माझ्या देशातील मातीतच व्हावा. माझ्या आई-वडिलांना तिथेच मरण आले होते.

शेख हसीना यांनी निवडणूक जिंकून पुन्हा एकदा सत्ता (पान ४ वर)

## पाकिस्तानी गँगस्टर भट्टीच्या नेटवर्कवर राज्यभर १५० छापे

### मराठवाड्यातून १३ ताब्यात; छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ९ जणांचा समावेश

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- भारतातील दहशतवादी भरती आणि देशांतर्गत संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवण्याच्या अनेक गंभीर प्रकरणांमध्ये एका कुख्यात पाकिस्तानी गँगस्टरचे नाव समोर आल्याने भारतीय सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. महाराष्ट्रातील काही तरुण सोशल मीडियाच्या माध्यमातून थेट पाकिस्तानातील लाहोर येथील हस्तकांच्या संपर्कात असल्याची धक्कादायक गुप्त माहिती मिळाल्यानंतर, राज्याच्या दहशतवाद विरोधी पथकाने हे आंतरराष्ट्रीय अतिरेकी नेटवर्क मुळासकट उद्ध्वस्त करण्यासाठी गुरुवारी मध्यरात्रीपासून राज्यभरात अभूतपूर्व आणि धडक छापेमारी सुरू केली आहे.

पोलिसांच्या ’स्पेशल सेल’ने बुधवारी शहजाद भट्टीशी संबंधित कथित दोन गट उद्ध्वस्त करून दिल्ली आणि पंजाबमधून सहा संशयित कार्यकर्त्यांना अटक केली होती; त्यानंतर महाराष्ट्रात या धाडी टाकण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र एटीएसच्या विशेष पथकांनी मुंबई, ठाणे, कुर्ला, वांद्रे, जोगेश्वरी, नवी मुंबई, मीरा रोड, भाईंदर, सांगली, सातारा, बीड, जालना, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण राज्यभरातील १५० हून अधिक संशयास्पद ठिकाणी एकाच वेळी छापे टाकून व्यापक शोधमोहीम सुरू केली आहे. या कारवाईचा मुख्य रोख पाकिस्तानातील लाहोरचा मूळ रहिवासी असलेल्या शहजाद भट्टी याच्या डिजिटल नेटवर्कवर आहे. शहजाद भट्टी हा पूर्वी ऑनलाइन कंटेंटच्या माध्यमातून सोशल मीडियावर सक्रिय होता, मात्र आता तो दुबईत बसून गुन्हेगारी टोळ्यांचे आंतरराष्ट्रीय नेटवर्क चालवत असल्याचे उघड झाले आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा गैरवापर करून असुरक्षित भारतीय तरुणांना पैशांचे आमिष दाखवून जाळ्यात ओढणे आणि त्यांच्यात कट्टरतावादी विचारसरणी रुजवून त्यांना दहशतवादी कारवायांकडे वळवणे, असा अत्यंत गंभीर आरोप त्याच्यावर आहे.

या देशव्यापी मोहिमेअंतर्गत एटीएसने मराठवाडा विभागामध्ये एकूण १३ महत्त्वाच्या ठिकाणी धाडी टाकल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक कारवाया छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात झाल्या असून, येथून ९ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. याशिवाय जालना जिल्ह्यातून २, धाराशिवमधून १ आणि बीड जिल्ह्यातून १ अशा एकूण १३ जणांना एटीएसच्या पथकाने ताब्यात घेऊन अज्ञात स्थळी चौकशीसाठी हलवले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, छत्रपती संभाजीनगरमधील मिसरवाडी परिसरातून ज्या संशयिताला ताब्यात घेण्यात आले, त्याची एक खाजगी कार काही दिवसांपूर्वी थेट राजस्थान येथील आंतरराष्ट्रीय सीमेजवळ गेली होती. हा रस्ते प्रवास सुरक्षा यंत्रणांना अत्यंत संशयास्पद वाटल्याने एटीएसने त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.

## आमची अन् काँग्रेसची विलीनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा नाही-सुप्रिया सुळे

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- पृथ्वीराज चव्हाण आणि माझी भेट काही झाली नाही. त्यांना आमचे कोणते खासदार भेटले आणि ते त्यांना अस्वस्थ वाटले माहिती नाही. आमच्या पक्षाचे ८ ही खासदार एक कुटुंब म्हणून काम करत असतो, आमच्यातील कोणी त्यांना भेटले असे मला वाटत नाही, पण ते राज्याचे मोठे नेते आहेत त्यांच्या कानावर काही आले असेल तर माझी नैतिक जबाबदारी आहे की त्यांच्याकडून याबद्दल माहिती घेतली पाहिजे, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. आमच्या पक्षात कोणीही नाराज नाही, आणि असला तर कोणी बाहेर जाऊन बोलणार नाही.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, नरेंद्र मोदी जेव्हापासून पंतप्रधान झाले त्यावेळेपासून माझ्या शपथविधीच्या चर्चा सुरू आहेत. मला आश्चर्य वाटते की गेली १२ वर्षे हीच चर्चा करण्याचा कंटाळा कसा येत नाही. टीव्ही अन् वर्तमानपत्रातच मी या चर्चा वाचते पण हे सूत्र कुठून बातम्या आणतात माहिती नाही. पक्ष विलीनीकरणाची चर्चा कुठेही सुरू नाही. अजित पवारांची ती इच्छा होती, आम्ही एकत्र येणार ते ठरले होते पण आता माझा भाऊ आता गेला आता काही चर्चा नाही. शरद पवार यांच्याशी या संबंधात काही चर्चा झालेली नाही. आमची आणि काँग्रेसची विलीनीकरणासंदर्भात काही चर्चा नाही. (पान ४ वर)

## सातबारा उताऱ्यात फेरफार करणारे १५ अधिकारी बडतर्फ; गुन्हेही दाखल होणार, चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- महसुली अभिलेखांमध्ये बेकायदेशीर फेरफार करून जमिनींचे व्यवहार सुलभ केल्याप्रकरणी राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली असून, अशा गैरव्यवहारात सहभागी आढळलेल्या राज्यातील १५ महसूल अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत केली. या अधिकाऱ्यांमध्ये उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार ॲड. अनिल परब यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिल्यानंतर प्रश्न उपस्थित केला. त्याला बावनकुळे यांनी उत्तर दिले. महसूल विभागातील गंभीर गैरप्रकारांची कबुली दिली. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १५५ अंतर्गत महसुली अभिलेखांतील आकस्मिक किंवा लिपिकीय चुका दुरुस्त करण्यासाठी दिलेल्या अधिकारांचा काही अधिकाऱ्यांनी गैरवापर करून जमिनींच्या नोंदींमध्ये बेकायदेशीर बदल केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय कलम ७०-ब अंतर्गत प्रशासकीय बदल आणि कलम ८५ अंतर्गत जमीन वाटणीच्या प्रक्रियेतही मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याचे सरकारच्या निदर्शनास आले आहे. या तिन्ही तरतुदींचा गैरफायदा घेत जमिनींच्या नोंदींमध्ये फेरफार करण्यात आल्याचे उघड झाल्याने सरकारने या कलमांमध्ये आवश्यक दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या काळात त्यासाठी सुधारणा विधेयक आणण्यात येणार असल्याचे बावनकुळे यांनी जाहीर केले.

बडतर्फ करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांवर केवळ प्रशासकीय कारवाईच नव्हे, तर फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले. “कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. महसूल व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि जमिनींच्या नोंदींतील गैरव्यवहार खपवून घेतले जाणार नाहीत,” असा इशाराही त्यांनी दिला.

## फडणवीस-तुपकर बैठकीत ३५ मागण्यांवर चर्चा; ८ दिवसांची मुदत

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- मागील सुमारे विस दिवसापासून प्रतीक्षा लागून असलेली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर यांची बैठक अखेर आज १० जुलैच्या मुहूर्तावर पार पडली. मुंबई येथील विधानभवनात भाजपाचे संकट मोचक अशी ख्याती असलेले मंत्री गिरीश महाजन यांची प्रमुख उपस्थिती लाभलेल्या या बैठकीत शेतकऱ्यांच्या एकूण ३५ मागण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी क्रांतिकारी चे शिष्टमंडळ, संबंधित खात्याचे सचिव, अधिकारी हजर होते.

सरसकट कर्जमुक्ती, पीकविमा, सोयाबीन-कापसाला योग्य भाव आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी रविकांत तुपकरांनी काल गुरुवारी विधानभवन परिसरात घुसण्याचा प्रयत्न केला. काही कार्यकर्त्यांनी मंत्रालय परिसरातील झाडावर चढून गळफास आंदोलन तर काहींनी अरबी समुद्रात उतरून आंदोलन केले. यामुळे सरकारने नरमाईचे धोरण स्वीकारले. गिरीश महाजन यांनी तुपकरांना गुरुवारी मुख्यमंत्री सोबत बैठक लावण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे (पान ४ वर)

## तुमच्या भ्रष्टाचाराने राज्याची बदनामी केलीय, नाना पटोलेंचा सरकारवर हल्लाबोल

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- जनतेला सरकारवर विश्वास राहिला नसल्याची टीका काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केली आहे. शेतकरी सरकारच्या विरोधातच झाला आहे. कर्जमाफीसंदर्भात सरकारनं अटी वगैरे काढू असं सांगितलं आहे. पण सरसकट कर्जमाफी करावी अशी आमची मागणी होती. कालही होती आणि आजही हीच मागणी आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना हमीभाव देण्याची मागणी होती. धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस संदर्भात नंतर बोलू असं सांगितल्याचे नाना पटोले यावेळी म्हणाले. सरकारनं आज कर्ममाफीसंदर्भातील दोन अटी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर बोलताना पटोलेंनी सरसकट कर्जमाफीची मागणी केली आहे.

मिसिंग लिंकसंदर्भात आज पण सांगितलं आहे की, निसर्गाने पाप उघडं केलं आहे. ५४० कोटी प्रति किमी खर्च केले आहेत. इतका खर्च केला तर फुलप्रुफ असला पाहिजे ना. राज्याची बदनामी तुमच्या भ्रष्टाचाराने केली आहे अशी टीका काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केली. राज्यात लोकशाही राहिली नाही, बघून घेईल पाहून घेईल, असं कधीच नव्हतं. तुम्ही आमच्या विरोधात बोलाल तर पाहून घेईल हे बोलणं चुकीचं असल्याचे नाना पटोले यावेळी म्हणाले. फडणवीस काय माझे व्यक्तिगत शत्रू नाहीत. सिद्धिविनायक, साईबाबा शिर्डी, पंढरपूरच्या मंदिरात गडबड आहे, सरकारनं ताब्यात घेतली आहेत. देवस्थानं आपल्या ताब्यात आहेत, त्यांची परिस्थिती काय? सत्तेच्या नावाने लूट करणारी माणसं बसली आहेत अशी टीका नाना पटोले यांनी केली. गजानन महाराजांच्या शेगावचा हिशोब व्यवस्थित आहेत, तिथे कुठेही ट्रस्ट नाही. पारदर्शकता किती हे आम्ही सांगू शकतो. बहुमताच्या आधारावर फसवलं जात असल्याचे नाना पटोले म्हणाले.

## अजितदादांच्या विमान अपघात प्रकरणाचा जानेवारी पूर्वी अंतिम अहवाल; फडणवीसांची माहिती

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी एक प्राथमिक अहवाल आपल्यासमोर आणला आहे. यासंदर्भात केंद्र सरकारशी चर्चा केली. हा सगळा अहवाल किती दिवसांत अपेक्षित आहे, याबाबत संबंधित मंत्रालय आणि मंत्र्यांना विचारले. यावर, त्यांनी सांगितले की, साधारणपणे जानेवारी पूर्वी अंतिम अहवाल येईल, अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी अनेक मुद्द्यांना सविस्तर उत्तरे दिली.

अंतिम आठवडा प्रस्तावात माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी चर्चा झाली. अजित पवार यांच्या संदर्भात घटना घडली, ते आपल्यातून निघून गेले. दोन प्रकारे तपास सुरू आहे. एक म्हणजे सीआयडी तपास करत आहे आणि दुसरे म्हणजे एएआयबी तपास (पान ४ वर)

## एक पैशाचा धोका झाला नाही, मिसिंग लिंकवरून टीका करणारे महाराष्ट्र द्रोहीच -एकनाथ शिंदे

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- आपल्या प्रकल्पांची बदनामी करणं, ही आमची बदनामी नाही, सरकारची बदनामी नाही, मुख्यमंत्र्याची बदनामी नाही. ही आपल्या राज्याची बदनामी आहे. आज या मिसिंग लिंकला पाहण्यासाठी देशातून नाही, विदेशातून लोक येत आहेत आणि म्हणून या ठिकाणी महाराष्ट्राचे शत्रूही करत नसतील एवढी बदनामी आज लोकशाहीमध्ये आपल्या विरोधी पक्षातील सदस्य किंवा सदस्य नसतील, आपले कोणी असतील, नेते असतील ते करत असतील, पण खऱ्या अर्थाने जे लोक महाराष्ट्राच्या प्रकल्पांची बदनामी करता आहेत, त्यांना आपण काय म्हणणार? आता इथं महाराष्ट्रामध्ये, राज्यामध्ये राहून महाराष्ट्राची बदनामी करणारे कोण? महाराष्ट्र द्रोहीच आहेत. हा महाराष्ट्र द्रोहच होऊ शकतो. हे राज्याचे दुश्मन जे आहेत. कुठलाही प्रकल्प आपला जर बदनाम झाला, तर ती महाराष्ट्राची बदनामी होते, कुठल्या पदाधिकाऱ्याची, मुख्यमंत्र्याची नाही, मंत्र्यांची नाही, त्यामुळे शेवटी आपल्याला हे देखील तारतम्य बाळगलं पाहिजे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत बोलताना दिली.

विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना शिंदे म्हणाले, मिसिंग लिंक हा इंजिनिअरिंग मार्वल आहे. मिसिंग लिंकला एकाही पैशाचा धोका झाला नाही, वाहतूक सुरू झाली. काही लोकांनी जे काही आकाश पाताळ एक केलं की मिसिंग लिंक पडला. अरे मिसिंग लिंक पडला का त्याची कमान पडली? किमान याची तरी तपासणी करून माहिती घेऊन तर बोलायला पाहिजे होतं. या प्रकल्पाची किंमत ६,६९५ कोटी रुपये, प्रत्यक्ष खर्च ७,१८९ कोटी रुपये, वाढ फक्त ७.२६ टक्के झाली. मंजूर रकमेच्या १० टक्क्यांपेक्षा (पान ४ वर)

## न्यायाधीशांच्या दिशेने कागद फेकले, सर्वोच्च न्यायालयात याचिकाकर्त्याचा राडा

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट भिरकावल्याच्या घटनेनंतर पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाच्या कोर्ट रुममध्ये गोंधळ झाला आहे. शुक्रवारी एका याचिकाकर्त्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू असताना याचिकाकर्त्याने न्यायाधीशांच्या दिशेने कागद भिरकावले आणि सरन्यायाधीशांबद्दल अश्लील शिवीगाळ केली. याचिकाकर्त्याचा बदललेला नूर पाहून सुरक्षा रक्षकांनी त्याला तात्काळ बाहेर काढले, त्यामुळे पुढील अनुचित प्रकार टळला. शुक्रवारी न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर प्रबल प्रताप नावाच्या याचिकाकर्त्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू होती. खंडपीठासमोर हजर होताच न्यायाधीशांनी विचारले, तुम्ही स्वतः पक्षकार आहात का? श्री प्रबल प्रताप? यावर होकारार्थी उत्तर देत याचिकाकर्त्याने खंडपीठालाच आदेश देण्यास सुरुवात केली. याचिकाकर्ता म्हणाला, ‘माननीय न्यायिक सेवक, मी तुम्हाला आदेश देतो की, तुम्ही लखनौच्या विकासनगर येथील जिल्हा पोलीस अधीक्षकांविरोधात एफआयआर दाखल करण्याचे आदेश द्यावेत.’

# लोकसंख्येवर नियंत्रण हवेच!

या विश्वातील कोणतीही गोष्ट नियंत्रणात असल्यास विश्वाचे त्यात हित आहे. एवढेच नव्हे तर विश्वात वावरणाऱ्या प्रत्येक घटकाला त्याला लाभच असतो. विश्वातील ज्या-ज्या देशांनी अतिरिक्त वाढणाऱ्या बाबींवर नियंत्रण ठेवले. त्या-त्या देशांची सर्वच क्षेत्रात उत्तम प्रगती झाली. विविध बाबींना नियंत्रणात ठेवणारे देश विविध क्षेत्रात आज अग्रेसर आहेत.

चीन या देशाने वाढत्या लोकसंख्येवर विविध प्रकारचे उपाय योजून आपल्या देशाची सर्वच क्षेत्रात उत्तमोत्तम प्रगती केली. इंग्लंड व अमेरिकेने वाढत्या दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी सांघिक प्रयत्न करून दहशतवाद नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानवी जीवनात नियंत्रणाला अतिशय महत्त्व आहे. 'मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक' म्हणजे एक प्रकारे मनावर, वर्तनावर नियंत्रणच होय. वृक्षतोडीवर नियंत्रण वन्य प्राणी शिकारीवर नियंत्रण अशा कितीतरी बाबींवर नियंत्रण ही काळाची गरज झालेली आहे.

आपल्या देशात बहुतेक सर्व बाबींवर नियंत्रण आणण्यात आपण यशस्वी झालेलो आहोत मात्र लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणण्यात अद्याप यश आलेले नाही. याच अपयशामुळे भारताची लोकसंख्या वाढ झपाट्याने होवून आज लोकसंख्या १४० कोटीच्या जवळपास पोहचल्याचा अंदाज आहे. भारतातील ही जनसंख्या वाढ भारतातील विविध योजनांसाठी आडकाठी ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा दर प्रचंड असल्याने आखलेल्या योजना अंमलात येईपर्यंत वाढलेल्या लोकसंख्येमुळे त्या योजनेचा बोजवारा होतो. भारतातील लोकसंख्या वाढ एक जटील समस्या आहे. या लोकसंख्या वाढीमुळे देशाच्या प्रगतीचा दर खुंटला आहे. लोकसंख्या वाढीमुळे अनेक सामाजिक कौटुंबिक, भौगोलिक, शैक्षणिक प्रश्न निर्माण होत आहेत.

भारतातील वाढती लोकसंख्या देशाच्या अनेक विकासात्मक मार्गात अडथळा ठरत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे सर्वांना आरोग्याच्या उत्तम सुविधा पुरविता येत नाहीत. अनेकांना सर्व सोयीयुक्त निवास नाहीत. वस्तीत रस्त्याच्या सुविधा नाहीत. पिण्यासाठी पुरेसे पाणी नाही. अन्न-वस्त्र-निवारा या तीन मुलभूत गरजांपासून बराच मोठा समुदाय वंचित आहे. एवढे सर्व भयानक चित्र डोळ्यासमोर असतानाही देशाची लोकसंख्या वाढतच आहे. या लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी खालील काही मार्गांचा विचार केल्या जावू शकतो.

भारतात महिलांच्या निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. महिलांना आपल्या कुटुंबाच्या सर्वांगीण विकासासाठी मर्यादित कुटुंब हवे याचे भान नसते. यामुळे कुटुंबाचा विस्तार वाढतच राहतो. जरी कुटुंबाची क्षमता पालन पोषणाची नसते तरी सुद्धा प्रजोत्पादन चालूच असते. याचा विपरित परिणाम राष्टाच्या विविध प्रकारच्या नियोजनावर होतो. यासाठी महिलांचे साक्षरता प्रमाण वाढल्यास त्यांना कुटुंब विस्ताराचे राष्टी परिणाम ज्ञात होतील व त्या कुटुंब विस्तार होवू देणार नाही. कुटुंब मर्यादित ठेवतील.

भारतीय महिला या मुळातच अंध श्रद्धाळू व भोळेभाबडेपणा जपणाऱ्या आहेत. वंशाचा दिवा म्हणजे 'मुलगा' हवा यासाठी पाळण्यावर पाळणे लांबवून कुटुंब विस्तार सातत्याने वाढत असता. वास्तविक महिलातील भोळेभाबडेपणा अंधश्रद्धाळूपणा घालविण्यासाठी त्यांना मुला-मुलीचे महत्त्व, त्यांचा कुटुंबातील स्थान व दर्जा समजावून सांगितला तर लोकसंख्येवर नियंत्रण येवू शकते.

गर्भनिरोधक साहित्य वापराचे प्रमाण सुशिक्षित व साक्षर कुटुंबांत मोठ्या प्रमाणात आहे. सर्व साधारण कुटुंब, ग्रामीण कुटुंब, मागास कुटुंब मोठ्या प्रमाणात आहे. सर्वसाधारण कुटुंब, ग्रामीण कुटुंब, मागास कुटुंब, यात मात्र गर्भनिरोधक साहित्य वापरल्या जात नाही. त्यामुळे साक्षरपेक्षा निरक्षर कुटुंबातच मुली-मुलींची संख्या भरपूर असते. यासाठी सर्वसाधारण कुटुंबात गर्भनिरोधक साहित्य वापराबाबत जनजागृतीची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे निश्चित फरक पडेल व लोकसंख्या नियंत्रणात येईल.

आजही १४-१५ वर्षाची मुलगी व १७-१८ वर्षाचा मुलगा यांची सर्रास लग्ने होत आहेत. कायद्याच्या नियम प्रमाणे लग्न होवू शकत नाहीत. या लग्नाकडे कुणी कायद्याचे पालनकर्ते पाहत नाहीत. लहान वयातील लग्नामुळे कुटुंब विस्तार जास्त होतो. वयाचा परिणाम राष्टीय नियोजनावर पडतो. लग्न लावताना वयाच्या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी आवश्यक आहे. कुटुंब नियोजनाच्या विविध पद्धतीबाबत देशातील विविध जाती धर्म व संप्रदायाच्या नागरिकांत नाना प्रकारचे गैरसमज आहेत. या गैरसमजांना दूर करण्यासाठी चर्चा, परिसंवादरूपी बैठका, मार्गदर्शन शिबिरे होण्याची नितांत गरज आहे. तरच लोकसंख्या नियंत्रण शक्य आहे. मर्यादित कुटुंब ठेवणाऱ्या पती-पत्नींना विविध प्रकारच्या शासकीय सोयी-सवलती दिल्यास बरेच कुटुंब आपले कुटुंब मर्यादित ठेवतील मात्र याबाबतची माहिती तळागाळात त्या घटकांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. राष्ट्राच्या हितासाठी, राष्टाच्या सर्वांगीण विकासासाठी, विकासाचा दर उंचावण्यासाठी शासनाने कायद्याचा आधार घेतला तरच लोकसंख्या नियंत्रण होवू शकते. देशात कायदा केल्याशिवाय नागरिकांना कुटुंब मर्यादित ठेवण्याचे फायदे कळणार नाही. शासकीय व खासगी कर्मचारी व अधिकारी यांनी आपले कुटुंब मर्यादित ठेवावे यासाठी कायदा करण्यास हरकत नाही. चीनसारखा देश कायद्याचा आधार घेतो मग आपण का घेवू नये. मुलामुलीत भेद न मानने या बाबतही प्रबोधन व्हावे. महिला समाज परिवर्तनाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यांचे मत परिवर्तन करून ही कुटुंब मर्यादित ठेवता येवू शकते.

# लोकसंख्या : विकासाचा पाया की आव्हान?




**दरवर्षी** ११ जुलै हा दिवस संपूर्ण जगभर 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वाढत्या लोकसंख्येची आकडेवारी मांडण्यात नसून, लोकसंख्या आणि शाश्वत विकास यांच्यातील परस्परसंबंध समजून घेण्यात आहे. १९८७ साली जगाची लोकसंख्या पाच अब्जांचा टप्पा ओलांडल्यानंतर लोकसंख्या वाढीचे सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक परिणाम लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने १९८९ मध्ये ११ जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून घोषित केला. आज जगाची लोकसंख्या आठ अब्जांहून अधिक झाली असून भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला आहे. ही बाब एकाच वेळी अभिमानाची, संधीची आणि चिंतनाची आहे. कारण लोकसंख्या ही राष्ट्राची सर्वात मोठी मानवी संपत्ती असली, तरी तिचे योग्य नियोजन आणि गुणवत्तापूर्ण विकास न झाल्यास ती अनेक समस्यांचे मूळ ठरू शकते.

लोकसंख्या म्हणजे केवळ एखाद्या देशात राहणाऱ्या लोकांची संख्या नव्हे. ती त्या राष्ट्राची कार्यशक्ती, उत्पादनक्षमता, सांस्कृतिक वैविध्य, ज्ञानसंपदा आणि सामाजिक प्रगतीचे प्रतीक असते. प्रत्येक राष्ट्राचा विकास हा तेथील लोकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. निरोगी, सुशिक्षित, कुशल, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेली आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार लोकसंख्या देशाला प्रगतीच्या शिखरावर नेऊ शकते. परंतु शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवेतील असमानता, बेरोजगारी, गरिबी, संसाधनांची कमतरता आणि सामाजिक विषमता यामुळे वाढती लोकसंख्या विकास प्रक्रियेसाठी गंभीर आव्हान ठरू शकते. त्यामुळे आज लोकसंख्या नियंत्रण हा शब्द मागे पडून लोकसंख्या व्यवस्थापन, लोकसंख्येची गुणवत्ता आणि मानवी विकास या संकल्पनांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारतातील लोकसंख्येचा इतिहास पाहिला तर स्वातंत्र्यानंतर आरोग्यसेवा, लसीकरण, औषधोपचार, अन्नधान्य उत्पादन आणि स्वच्छता यामध्ये मोठी सुधारणा झाली. यामुळे मृत्युदर झपाट्याने कमी झाला; परंतु काही दशकांपर्यंत जन्मदर तुलनेने जास्त राहिल्याने लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली. कालांतराने शिक्षणाचा प्रसार, महिलांचे सक्षमीकरण, शहरीकरण, आरोग्य सुविधांचा विस्तार आणि कुटुंब नियोजनाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अनेक राज्यांमध्ये प्रजनन दरात घट झाली आहे. तथापि, भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशात लोकसंख्या विषयक चित्र सर्वत्र सारखे नाही. काही राज्यांमध्ये लोकसंख्या स्थिरतेकडे वाटचाल होत असताना काही भागांमध्ये अजूनही तुलनेने जास्त प्रजनन दर दिसून येतो. त्यामुळे लोकसंख्या धोरण तयार करताना प्रादेशिक गरजा लक्षात घेणे आवश्यक ठरते.

लोकसंख्या वाढीचा सर्वाधिक परिणाम नैसर्गिक संसाधनांवर होतो. जमीन, पाणी, जंगल, ऊर्जा, अन्नधान्य आणि खनिज संपत्ती ही संसाधने मर्यादित आहेत. लोकसंख्या वाढत गेली की या संसाधनांवरील ताणही वाढतो. शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्र कमी होत जाते, भूजलाची पातळी खालावते, जंगलतोड वाढते, जैवविविधतेचा ऱ्हास होतो आणि पर्यावरणीय समतोल बिघडतो. हवामान बदलाच्या गंभीर संकटाच्या पार्श्वभूमीवर वाढती लोकसंख्या आणि संसाधनांचा अनियंत्रित वापर ही चिंतेची बाब ठरत आहे. म्हणूनच शाश्वत विकासाचा विचार करताना लोकसंख्या व्यवस्थापनाला केंद्रस्थानी ठेवणे अत्यावश्यक आहे.

शहरीकरण हा वाढत्या लोकसंख्येचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि आधुनिक जीवनशैलीच्या शोधात लाखो लोक ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर करतात. परिणामी महानगरांमध्ये लोकसंख्येची प्रचंड गर्दी होते. निवासस्थानांची कमतरता, झोपडपट्ट्यांचा विस्तार, वाहतूक कोंडी, जल, वायू व ध्वनी प्रदूषण, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापनाच्या समस्या आणि सार्वजनिक आरोग्यावरील वाढता ताण ही वाढत्या शहरी लोकसंख्येची प्रमुख आव्हाने आहेत. यावर उपाय म्हणून नियोजनबद्ध शहरी विकास, उपग्रह शहरांची निर्मिती, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि पायाभूत सुविधांचा समतोल विस्तार आवश्यक आहे.

लोकसंख्या आणि आरोग्य यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. माता व बाल आरोग्य, पोषण, सुरक्षित प्रसूती, बालमृत्यू कमी करणे, किशोरवयीन आरोग्य, लसीकरण, प्रजनन आरोग्य आणि कुटुंब नियोजन या सर्व बाबी लोकसंख्या व्यवस्थापनाशी संबंधित आहेत. निरोगी माता आणि निरोगी बालक हे निरोगी समाजाचे आधारस्तंभ असतात. प्रत्येक दांपत्याला कुटुंबाचा आकार ठरविण्याचा अधिकार आहे. त्यासाठी त्यांना अचूक माहिती, समुपदेशन, आधुनिक गर्भनिरोधक साधने आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. कुटुंब नियोजन म्हणजे लोकसंख्या कमी करण्याचा कार्यक्रम नसून आरोग्यदायी, आनंदी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंब घडविण्याचा प्रयत्न आहे. महिलांचे शिक्षण आणि सक्षमीकरण हे लोकसंख्या स्थिरतेचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. जेव्हा मुलींना उच्च शिक्षण, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक सुरक्षितता मिळते, तेव्हा विवाहाचे वय वाढते, मातृत्वाचे नियोजन होते, कुटुंब नियोजनाचा स्वीकार वाढतो आणि संपूर्ण कुटुंबाचे जीवनमान उंचावते. शिक्षित महिला आपल्या मुलांच्या आरोग्य, शिक्षण आणि पोषणाबाबत अधिक सजग असतात. म्हणूनच 'एक मुलगी शिकली तर दोन कुटुंबे घडतात' हे विधान लोकसंख्या व्यवस्थापनाच्या संदर्भातही तितकेच महत्त्वाचे ठरते. भारतासमोर आज सर्वात मोठी संधी म्हणजे त्याची युवा लोकसंख्या होय. देशातील मोठा वर्ग हा कार्यक्षम वयोगटात आहे. यालाच 'लोकसंख्यात्मक लाभांश' असे म्हटले जाते. जर या युवकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक कौशल्ये, डिजिटल साक्षरता, रोजगार, उद्योजकतेसाठी प्रोत्साहन आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या, तर भारत जगातील सर्वात शक्तिशाली अर्थव्यवस्थांपैकी एक बनू शकतो. परंतु याच युवकांना रोजगार मिळाला नाही, कौशल्यांचा अभाव राहिला आणि विकास प्रक्रियेत सहभाग मिळाला नाही, तर बेरोजगारी, असंतोष, गुन्हेगारी आणि सामाजिक अस्थिरता वाढण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

रोजगार आणि लोकसंख्या यांचा परस्परसंबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढत्या लोकसंख्येसाठी वाढत्या रोजगार संधी निर्माण करणे आवश्यक असते. आजच्या काळात केवळ पारंपरिक नोकऱ्यांवर अवलंबून राहणे शक्य नाही. कृषी प्रक्रिया उद्योग, पर्यटन, सेवा क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा, जैवतंत्रज्ञान, ई-कॉमर्स, स्टार्टअप्स आणि स्वयंरोजगार या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. शिक्षण व्यवस्थेनेही रोजगारक्षम कौशल्यांवर भर दिला पाहिजे.

लोकसंख्या वाढीचा परिणाम शिक्षण व्यवस्थेवरही होतो. विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना शाळा, महाविद्यालये, शिक्षक, प्रयोगशाळा, वाचनालये आणि डिजिटल सुविधा यांचीही वाढ आवश्यक ठरते. दर्जेदार शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले नाही तर सामाजिक विषमता वाढते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक आणि कौशल्याधारित शिक्षणावर दिलेला भर हा लोकसंख्येच्या गुणवत्तापूर्ण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

पर्यावरण आणि लोकसंख्या यांचा संबंध आज अधिक गंभीर झाला आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलांची तोड, प्रदूषण, कार्बन उत्सर्जन, पाण्याचा अतिवापर आणि जैवविविधतेचे नुकसान वाढत आहे. हवामान बदलामुळे पूर, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक जीवनशैली, जलसंवर्धन, ऊर्जा बचत, वृक्षारोपण आणि कचरा व्यवस्थापन या बाबींमध्ये लोकसहभाग आवश्यक आहे. लोकसंख्येचे व्यवस्थापन आणि पर्यावरण संरक्षण ही एकमेकांना पूरक अशीच प्रक्रिया आहे.

जागतिक लोकसंख्या दिनाचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे लिंगभाव समानता होय. मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव दूर करणे, बालविवाह रोखणे, महिलांना समान संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या आरोग्याचे संरक्षण करणे हे शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे. महिलांच्या निर्णयक्षमतेचा आदर करणारा समाजच लोकसंख्या व्यवस्थापनात यशस्वी ठरतो. भारतातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाला सात दशकांहून अधिक इतिहास आहे. भारत हा अधिकृत राष्ट्रीय कुटुंब नियोजन कार्यक्रम सुरू करणारा जगातील पहिला देश मानला जातो. कालानुरूप या कार्यक्रमात मोठे बदल झाले. आज हा कार्यक्रम सक्तीऐवजी स्वेच्छा, माहितीपूर्ण निवड, आरोग्य हक्क आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांवर आधारित आहे. आशा सेविका, अंगणवाडी कर्मचारी, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि विविध आरोग्य मोहिमांद्वारे ग्रामीण आणि दुर्गम भागातही जनजागृती करण्यात येत आहे. तरीही काही ठिकाणी अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक रूढी आणि अपुऱ्या सुविधा यांमुळे अपेक्षित प्रगती झालेली नाही. त्यामुळे लोकजागृती आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा या दोन्ही गोष्टींना समान महत्त्व देणे आवश्यक आहे.

लोकसंख्या विषयक धोरण आखताना वृद्ध लोकसंख्येचाही विचार करावा लागतो. आयुर्मान वाढल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. त्यांच्यासाठी आरोग्य सेवा, सामाजिक सुरक्षा, निवृत्ती वेतन, मानसिक आरोग्य, वृद्धाश्रमांऐवजी समुदायाधारित सेवा आणि सन्मानपूर्वक जीवन यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. एका बाजूला युवा लोकसंख्या आणि दुसऱ्या बाजूला वाढती वृद्ध लोकसंख्या या दोन्ही घटकांचा समतोल साधणे हे आधुनिक लोकसंख्या धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

तंत्रज्ञानामुळे लोकसंख्या व्यवस्थापन अधिक परिणामकारक झाले आहे. डिजिटल आरोग्य नोंदी, कृत्रिम बुद्धिमत्ता, भौगोलिक माहिती प्रणाली, मोबाईल आरोग्य सेवा, टेलिमेडिसिन आणि डेटा विश्लेषण यांच्या साहाय्याने आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविता येतात. जनगणना, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण आणि विविध लोकसंख्याशास्त्रीय अभ्यास यांच्या आधारे शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे सुलभ होते. अचूक आकडेवारीशिवाय प्रभावी नियोजन शक्य नसते. लोकसंख्या व्यवस्थापनामध्ये स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमे, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने योग्य माहितीचा प्रसार होऊ शकतो. लोकसंख्येविषयक अनेक गैरसमज दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी माध्यमांनी सकारात्मक भूमिका बजावणे आवश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये लोकसंख्या शिक्षण, आरोग्य शिक्षण आणि जीवनकौशल्य शिक्षण यांचा समावेश केल्यास भावी पिढी अधिक जबाबदार नागरिक म्हणून घडू शकते.

जागतिक लोकसंख्या दिन हा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की, लोकसंख्या ही समस्या नाही; तर तिचे अयोग्य नियोजन ही समस्या आहे. जर प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार शिक्षण, आरोग्य सेवा, पोषण, स्वच्छता, सुरक्षित निवास, रोजगार आणि समान संधी उपलब्ध झाल्या, तर मोठी लोकसंख्या हे राष्ट्राचे सर्वात मोठे सामर्थ्य ठरते. आज जगातील अनेक विकसित देशांना कामगारांची कमतरता भासत आहे, तर भारताकडे प्रचंड युवा मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्यामुळे या मानवी संपत्तीचे ज्ञान, कौशल्य आणि नवोपक्रमामध्ये रूपांतर करणे ही काळाची गरज आहे.

आजच्या डिजिटल आणि जागतिकीकरणाच्या युगात लोकसंख्येचा प्रश्न केवळ एका देशापुरता मर्यादित राहिलेला नाही. हवामान बदल, अन्नसुरक्षा, पाणी, स्थलांतर, आरोग्य आणि आर्थिक विकास या सर्व बाबींवर लोकसंख्येचा प्रभाव पडतो. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्तता करताना लोकसंख्या व्यवस्थापनाला विशेष महत्त्व दिले जात आहे. गरिबी निर्मूलन, दर्जेदार शिक्षण, चांगले आरोग्य, लिंगभाव समानता, स्वच्छ पाणी, सन्मानजनक रोजगार आणि पर्यावरण संरक्षण ही सर्व उद्दिष्टे लोकसंख्येच्या गुणवत्तापूर्ण विकासाशी जोडलेली आहेत. भारतातील प्रत्येक नागरिकाने छोट्या आणि सुजाण कुटुंबाची संकल्पना स्वीकारणे, महिलांचा सन्मान करणे, मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, संसाधनांचा काटकसरीने वापर करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. लोकसंख्या विषयक प्रश्न केवळ शासन सोडवू शकत नाही; त्यासाठी समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. जनजागृती, शिक्षण, आरोग्य सेवा आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातूनच लोकसंख्या आणि विकास यांच्यातील संतुलन साधता येईल.

शेवटी, जागतिक लोकसंख्या दिन हा केवळ दिनविशेष नसून मानवी विकासाचा, सामाजिक उत्तरदायित्वाचा आणि शाश्वत भविष्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. लोकसंख्येची संख्या वाढण्यापेक्षा तिची गुणवत्ता वाढणे अधिक महत्त्वाचे आहे. सुशिक्षित, निरोगी, कौशल्यसंपन्न, पर्यावरण-जागरूक आणि समान संधी मिळालेली लोकसंख्या हेच कोणत्याही राष्ट्राचे खरे सामर्थ्य असते. लोकसंख्या, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सामाजिक न्याय यांचा समतोल राखत विकासाची वाटचाल केली, तर भारत केवळ सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश राहणार नाही, तर सर्वाधिक सक्षम, समृद्ध आणि मानवी मूल्यांचा आदर करणारे राष्ट्र म्हणून जगासमोर आदर्श निर्माण करेल. जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आपण सर्वांनी जबाबदार नागरिक म्हणून लोकसंख्येच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी हातभार लावण्याचा निर्धार केला, तरच विकसित, समृद्ध आणि शाश्वत भारताचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होईल.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# शेतकऱ्यांची कर्जमुक्तीतून आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल

नाशिक, दि. १० (प्रतिनिधी) – महाराष्ट्राची ओळख ही कृषीप्रधान राज्य म्हणून आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असलेला शेतकरी सक्षम झाला, तरच राज्याचा सर्वांगीण विकास अधिक गतिमान होऊ शकतो. बदलते हवामान, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाच्या बाजारभावातील अनिश्चितता यामुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देत त्यांना नव्याने उभे करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ही योजना शेतकऱ्यांना कर्जमुक्तीतून आर्थिक सक्षमतेकडे नेणारी ठरणार आहे.




ही योजना केवळ कर्जमाफीची प्रक्रिया नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनर्बांधणीचा, आत्मविश्वास वृद्धीचा आणि शेती व्यवसायाला अधिक सक्षम करण्याचा व्यापक प्रयत्न आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देणे, त्यांना पुन्हा संस्थात्मक कर्जप्रवाहात आणणे आणि शेतीमध्ये नव्या गुंतवणुकीसाठी सक्षम करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना मोठा दिलासा** – राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ राज्यातील सुमारे ५६ लाखांहून अधिक पात्र शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. राज्याच्या इतिहासातील मोठ्या कर्जमुक्ती उपक्रमांपैकी ही एक योजना मानली जात आहे.

या योजनेअंतर्गत पात्र थकबाकीदार शेतकऱ्यांच्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाला कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे कर्जफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

**मोठ्या थकबाकीदारांसाठी एकवेळ समझोता योजना** – ज्या पात्र शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, अशा शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (जपश ढळाश डशीींश्रशाशपीं – जढड) योजना लागू करण्यात आली आहे. संबंधित शेतकऱ्यांनी दोन लाख रुपयांपेक्षा जास्त असलेली थकबाकी भरल्यानंतर शासनाकडून त्यांच्या कर्जखात्यात दोन लाख रुपयांपर्यंतची मदत जमा करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे मोठ्या कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळून ते पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही सन्मान** – कर्जमुक्ती योजनेमध्ये शासनाने नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विचार केला आहे. आर्थिक शिस्त राखत वेळेवर कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळून कर्ज व्यवहारातील शिस्त अधिक बळकट होणार आहे.

**पारदर्शक अंमलबजावणीसाठी डिजिटल प्रणालीचा वापर** – योजनेची अंमलबजावणी जलद, अचूक आणि पारदर्शक व्हावी यासाठी शासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. महाआयटीच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या विशेष ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात येत आहे. व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, प्राथमिक कृषी पतसंस्था आणि संबंधित विभागांकडून कर्जखात्यांची माहिती पोर्टलवर नोंदविण्यात येत आहे. संगणकीय पडताळणी, आधार प्रमाणीकरण आणि थेट लाभ हस्तांतरण (उ्इढ) प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात लाभाची रक्कम जमा केली जाणार आहे.

**आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी महत्त्वाची** – योजनेचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी आधार प्रमाणीकरणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न असल्याची खात्री करावी. तसेच ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. यासोबतच ॲग्रीस्टॅक नोंदणी, सातबारा उतारा, कर्ज खात्याचा तपशील, आधार कार्ड, बँक पासबुक आदी आवश्यक माहिती अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही मध्यस्थ किंवा दलालांवर विश्वास न ठेवता संबंधित बँक, सहकारी संस्था अथवा अधिकृत केंद्राशीच संपर्क साधावा.

**तक्रार निवारणासाठी विशेष व्यवस्था**

योजनेमध्ये पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. पात्र लाभार्थ्यांची यादी ग्राम पंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, संबंधित बँक शाखा तसेच अधिकृत प्रणालीवर उपलब्ध करून दिली जाणार आहे. लाभार्थी यादी किंवा माहितीमध्ये काही त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना तक्रार निवारण यंत्रणेकडे अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत लाभ पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

**कर्जमुक्तीनंतर नव्या शेतीसाठी संधी**

कर्जमुक्तीचा लाभ मिळाल्यानंतर शेतकरी पुन्हा कर्जपात्र होणार आहेत. त्यामुळे खरीप आणि रब्बी हंगामासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध होण्यास मदत होईल. सुधारित बियाणे, आधुनिक यंत्रसामग्री, सिंचन सुविधा आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक उत्पादनक्षम करण्याची संधी शेतकऱ्यांना मिळेल. शेती उत्पादनात वाढ, उत्पन्नवाढ आणि ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांना गती मिळण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे.

**शाश्वत शेतीसाठी शासनाचे विविध उपक्रम**

शेतकरी कल्याणाचा व्यापक दृष्टिकोन ठेवून शासनाकडून जलसंधारण, सौर कृषी पंप, कृषी यांत्रिकीकरण, सिंचन सुविधा, प्रमाणित बियाणे, आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कृषी उपाययोजना आणि हवामानपूरक शेतीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. कर्जमुक्ती योजनेसोबत या सर्व उपाययोजनांमुळे शेती अधिक सक्षम, शाश्वत आणि स्पर्धात्मक होण्यास मदत होणार आहे.

**शेतकरी सक्षम, तर राज्य सक्षम**

'शेतकरी समृद्ध तर राज्य समृद्ध' या संकल्पनेला प्रत्यक्ष बळ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण करणारा महत्त्वाचा निर्णय आहे. कर्जाच्या दुष्टचक्रातून मुक्तता, नव्या गुंतवणुकीची संधी आणि आधुनिक शेतीकडे वाटचाल या माध्यमातून ही योजना राज्यातील कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारी ठरणार आहे.

# तांडा वाड्यातील अनेकांच्या स्वप्नांना शिक्षणाचे पंख देणारे प्राचार्य राठोड सदैव स्मरणात राहतील- मंत्री संजय राठोड



छत्रपती संभाजीनगर, दि.१० (प्रतिनिधी) - येथील वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य राजाराम राठोड (वय ९०) यांच्या पार्थिवावर आज महाविद्यालयाच्या प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे गुरुवारी (दि.९) दुपारी निधन झाले होते. शासनाच्या वतीने मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. तांडा वाड्यातील अनेकांच्या स्वप्नांना शिक्षणाचे पंख देणारे प्राचार्य राठोड सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दात मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी त्यांना श्रद्धांजली वाहीली.

अंत्यसंस्कार समयी खा. डॉ. कल्याण काळे, माजी खा. इम्तियाज जलील, आ.राजेश राठोड, माजी मंत्री राजेंद्र दर्डा, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, प्राचार्य संजीव रेड्डी, गौरसेना अध्यक्ष संजय चव्हाण, बंजारा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष बापुराव राठोड, बापू घडमोडे, प्रा. सुसिंग जाधव, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, वसंतराव नाईक महाविद्यालय, बळीराम पाटील विद्यालय येथील शिक्षक, कर्मचारी, आजी माजी विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री संजय राठोड यांनी श्रद्धांजलीपर शोकाकूल समुदायासमोर आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले की, काही माणसं आयुष्य जगत नाहीत, तर हजारो आयुष्यांना जगण्याचा अर्थ देतात. काही व्यक्ती स्वतः साठी इतिहास घडवत नाहीत, तर समाजाच्या भवितव्याचा इतिहास घडवतात. अशीच एक तेजस्वी ज्ञानज्योत आज अनंतात विलीन झाली.प्राचार्य राजारामजी राठोड यांनी वंचित, शोषित, भटक्या-विमुक्त, तांडा-वाडीतील असंख्य मुलांच्या डोळ्यांतील स्वप्नांना त्यांनी शिक्षणाची पंखे दिली. अनेकांच्या हातात पुस्तक दिले, अनेकांच्या मनात आत्मविश्वास जागवला आणि अनेक कुटुंबांच्या भविष्याला उज्ज्वल दिशा दिली.

वसंतरावजी नाईक यांनी समाजातील उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे जे स्वप्न पाहिले, त्या स्वप्नाचे आयुष्यभर निष्ठेने संवर्धन करणाऱ्या थोर शिलेदारांमध्ये प्राचार्य राजाराम जी राठोड यांचे स्थान अग्रक्रमाचे राहील. त्यांनी त्यांनी केवळ महाविद्यालय उभे केले नाही, तर माणसे घडवली; पदवीधर नव्हे तर जबाबदार नागरिक घडवले. वाड्या, वस्त्या, तांडे आणि झोपडपट्ट्यांतील गरीब, गरजू, वंचित मुलांना त्यांनी शिक्षणाचा अधिकार दिला. हजारो विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या प्रेरणेचा, त्यागाचा आणि मायेचा हात कायम राहिला.

प्राचार्य राठोड यांच्या पश्चात मुलगे ॲड. अभय राठोड, नितीन राठोड, डॉ. बिपीन राठोड, जावई डॉ. अशोक चव्हाण, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

प्राचार्य राठोड यांनी १९६० ते जून १९६९ दरम्यान उदगीर तालुक्यातील विद्यानिधी हायस्कूल येथे मुख्याध्यापक म्हणून काम केले. १९६६ ते १९७२ दरम्यान उदगीरच्या शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे संघटन सचिव, १९७२ ते १९९७ या कालावधीत वसंतराव नाईक महाविद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले. १९६० मध्ये मराठवाड्यात वसतिगृह सुविधा सुरू केली. १९७२ मध्ये वसंतराव नाईक महाविद्यालयाची, तर १९८३ मध्ये बळीराम पाटील प्राथमिक शाळेची स्थापना केली. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या उपेक्षित भटक्या आणि विमुक्त समाजासाठी त्यांनी भरीव काम केले. अखिल भारतीय बंजारा सेवा संघाचे सचिव म्हणून त्यांनी भरीव काम केले.

# सावधान!लोकसंख्या अशीच वाढत राहिली तर निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास सर्वांनाच भोगावा लागेल

**लोकसंख्या** अशीच वाढत राहाली तर 'निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास'जगातील प्रत्येक व्यक्तीला,संपूर्ण जीवजंतूला व वन्य प्राण्यांना भोगावाच लागेल. वाढत्या लोकसंख्येचा धोका पहाता जागतिक स्तरावर लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. लोकसंख्या वाढ ही जगातील प्रत्येक देशाच्या विकासामध्ये व्यत्यय निर्माण करीत असते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाच्या उद्देशाने ११ जुलै १९८७ ला जागतिक लोकसंख्येचा विचार केला तर ५०० कोटी लोकसंख्या असल्याचे लक्षात आले.ही बातमी जगभर पसरली. त्या उद्देशाने लोकसंख्या नियंत्रणासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येवु लागले.संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकासविषयक कार्यक्रमाच्या (युएनडीपी)गव्हर्निंग कौन्सिलने ११ जुलै हा दिवस'जागतिक लोकसंख्या दिन' जगभर साजरा केला जावा अशी शिफारस केली.या शिफारशी नुसार ११ जुलै १९८९ पासून ११ जुलै हा दिवस'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून साजरा केला जातो. जगाची लोकसंख्या १९८७ ला ५०० कोटी होती.यानंतर २०१९ मध्ये ७७० कोटींवर पोचली. यात सर्वाधिक लोकसंख्या आशिया खंडात ४४६.२७ कोटी असल्याचे दिसून आले.यानंतर आफ्रिका, युरोप,उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया व अंटार्टिका अशा पध्दतीने या खंडात लोकसंख्येचा क्रमवार होता.भारताचा विचार केला तर १९५१ साली फक्त ३६ कोटी लोकसंख्या होती. ती आजच्या घडीला १४० कोटीच्यावर गेली आहे. हा भारतासाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.

२०१४ च्या आकडेवारी नुसार सर्वाधिक लोकसंख्या असनारे देश याप्रमाणे प्रथम चीन,भारत, अमेरिका, इंडोनेशिया, पाकिस्तान, ब्राझील, नायजेरिया, बांगलादेश,रशिया व जापान ४३८ कोटी लोक या दहा देशात रहातात. हा आकडा जागतिक लोकसंख्येच्या ५७ टक्के इतका आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.आज संपूर्ण जगात लोकसंख्या वाढीचा विचार केला तर भारताच्या भुभागाच्या तुलनेत लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर आहे आणि चीनच्या भुभागाच्या तुलनेत चीन लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या घरात आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.भारतातील लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रत्येक राज्यांनी पुढाकार घ्यायला पाहिजे व मुख्यत्वेकरून सर्वच मुख्यमंत्र्यांनी याकडे जातीने लक्ष घालायला हवे.त्याचबरोबर पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष व पक्ष-विपक्षांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी पुढाकार घ्यायला हवा.वाढती लोकसंख्या संपूर्ण देशालाच नाही तर संपूर्ण जगाला घातक ठरत आहे.वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक देशांना कठोर परीस्थितीशी सामना करावा लागत आहे.यामुळे बेरोजगारी, भुकमरी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्म हत्यां, महागडे शिक्षण, उपासमार, कुपोषण, पाणी टंचाई, इंधन, आरोग्य विषयक सुविधांचा अभाव, औषधांची समस्या, मुलभूत सुविधांचा अभाव इत्यादींचा सामना आज सर्वांनाच करावा लागत आहे.

वाढती लोकसंख्या प्रत्येक देशाला विकासापासून वंचित करण्याचे कार्य करीत असते याकरिता प्रत्येक देशाचे दायीत्व बनते की लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटतो व देश डबघाईस येतो. देशाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरीकरणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्याचप्रमाणे औद्योगिकीकरण व उद्योग धंदे मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांच्या रहाण्याच्या व्यवस्थेकरीता मोठ्या प्रमाणात जंगल संपत्तीचा विनाश होत आहे.म्हणजेच लोकसंख्या वाढीमुळे जंगलसंपदा संपुष्टात येत आहे.त्यामुळे आज जंगलातील हिंसक प्राणी शहरांकडे धाव घेतांना दिसतात.

भारतातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता यावर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. वाढत्या लोकसंख्येचे विक्राळ रूप पहाता आता भारत सरकारने 'एक परीवार एकच अपत्य' असा कायदा सर्वांसाठी अमलात आणावा मग तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा असो.यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवता येईल व देशाचा विकास होईल.अन्यथा भारतात अशीच लोकसंख्या वाढत राहाली तर मानुस मानसाला मारल्या शिवाय रहाणार नाही. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या विकासासाठी अनेक अडथळे निर्माण होतांना दिसतात. भारतात लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढली आहे की अनेक लोक फुटपाथवर झोपतांना दिसतात, नदीच्या काठावर घरे, रेल्वे रूळाच्या जवळ घरे, तलावाच्या काठावर घरे अशा दुर्घटना स्थळी मोठ्या प्रमाणात झोपड्या पहायला मिळतात हा संपूर्ण प्रकार लोकसंख्या वाढीचा आहे. आज जगाला लोकसंख्या वाढी पेक्षा वृक्ष वाढवीण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष तोडीमुळे सुर्य आग ओकत आहे.आज पृथ्वी लोकसंख्या वाढीच्या भाराखाली दिवसेंदिवस दबत आहे. त्यामुळे आज लोकसंख्या वाढीपेक्षा निसर्ग वाढीवर भारतासह संपूर्ण जगाने जास्त भर दिला पाहिजे. 'निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास' दिवसेंदिवस संपूर्ण जगाला होत आहे.याला कोठेतरी रोखले पाहिजे.मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी सुखसमाधानासाठी लोकसंख्या वाढवीली आहे. त्यामुळे आज हिंसक प्राणी मानवावर आक्रमण करताना दिसतात यामुळे मनुष्य व प्राणी यांच्यात वैरत्व निर्माण झाले आहे.ही परीस्थिती मानवाने स्वत:हुन ओढावली आहे.

मानवाच्या अतीरेकामुळे आज पृथ्वीचे संतुलन डगमगतांना दीसत आहे.त्याचबरोबर समुद्राची पातळी दरवर्षी सरासरी ३.५ मिलिमीटरने वाढत आहेच सोबतच पाण्याचे उष्णतामान सुध्दा वाढत आहे.म्हणजेच दिवसेंदिवस पृथ्वीचा भुभाग धोकादायक स्थितीमध्ये मानवाने आणल्याचे दिसून येते.

कोव्हिड-१९ महामारी ही सुध्दा मानवाच्या अतीरेकाचे कारण आहे.चीनमध्ये एवढी लोकसंख्या वाढली आहे की तेथील लोक समुद्र किनाऱ्यावर रहातात. त्यामुळे चीन 'विस्तारवादाचे' घृनीत कृत्य करतांना दिसतो.हा संपूर्ण प्रकार चीनच्या वाढत्या लोकसंख्येमुळे उद्भवलेला आहे. चीनच्या विस्तारवादाच्या भुमिकेमुळे जगातील अनेक देश चीनच्या विरोधात गेले आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीचा एवढा घातक परिणाम होत आहे की मानव एक-मेकावर बंदुक ताणुन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसला आहे.यावरून स्पष्ट होते की लोकसंख्या वाढीमुळे जग भुईसपाट व्हायला काहीच वेळ लागणार नाही.त्यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे प्रत्येक देशाचे प्रथम कर्तव्य असायला पाहिजे असे मी समजतो.

आज लोकसंख्या वाढीमुळे भारताच्या दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.वाढती लोकसंख्या पहाता अनेक व्यापारीवर्ग भेसळयुक्त पदार्थ,कार्बाइडने पिकवीलेली विषारीयुक्त फळे, भेसळयुक्त दूध इत्यादी अनेक विषारी वस्तुचा वापर लोकांना करावा लागतो. यामुळे घातक आजार सुध्दा होवु शकतात आणि होत आहे.

यामागचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय.अनेक कारणांवरून असे दिसून येते की वाढत्या लोकसंख्येमुळे भारतासह अनेक देशांमध्ये विक्राळ रूप धारण केले आहे.याला रोखण्यासाठी कठोर पावले उचलन्याची नितांत गरज आहे.जगात व देशात वाढत्या प्रदूषणाला जबाबदार वाढती लोकसंख्याच आहे. लोकांच्या सुखसुविधांकरीता विमान वाहातुक,रोड वाहातुक, रेल्वे वाहतूक व इतर वाहतूक इत्यादी मोठ्या प्रमाणात वाहने धावतांना दीसतात यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचा परीनाम असा होत आहे की अनेक आजारांना खुले आमंत्रण दिल्या जात आहे.त्यामुळे ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन लक्षात घेता देशातील सर्व राज्यांनी व केंद्र सरकारनी वाढती लोकसंख्या नियंत्रणासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत.काही राजकीय पक्ष आपला धर्म धोक्यात आहे, आपल्या धर्माची लोकसंख्या कमी होत आहे असे सांगून धर्माचे काही ठेकेदार लोकसंख्या वाढवीण्याचा सल्ला देतात. अशांवर राज्य व केंद्र सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे.त्यामुळे मानवाने संपूर्ण सीमारेषांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.मानवाच्या बुध्दीजीपनामुळे आज निसर्गाच्या सान्निध्यात रहाणाऱ्या पशु-पक्षांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय. भारताने लोकसंख्येवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर पुढेचालुन अनेक कठीणायीचा सामना करावा लागेल हेही तेवढेच सत्य आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्या अशीच झपाट्याने वाढत रहाली तर कोणतेही सरकार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकणार नाही.त्यामुळे आताच सावधगिरीचे उपाय योजले पाहिजेत व लोकसंख्येवर नियंत्रण आनले पाहिजे. लोकसंख्यावाढीमुळे भारतासह जगात केव्हाही महाप्रलय येवु शकतो हे सरकारने व जनतेने लक्षात ठेवले पाहिजे. जगातील लोकसंख्या अशाच वेगवान गतीने वाढत रहाली तर मानवाच्या उष्णतेमुळे आणि अतीरेकामुळे शिखरातील बर्फ आपोआप वितळायला सुरूवात होईल व समुद्राची पातळी आपोआप वाढत जाईल याला नाकारता येत नाही.त्यामुळे लोकसंख्येच्या बाबतीत सावधान होने गरजेचे आहे.

केंद्र सरकार, राज्य सरकार व पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी यांना आग्रह करतो की लोकसंख्या नियंत्रणासाठी सर्वोतोपरी कठोर पाऊल उचलण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जगातील प्रत्येक देशांनी आजच्या घडीला वृक्षारोपण करून करोडो झाडे लावण्याचा संकल्प करावा.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**


# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' माहितीपटाचा प्रीमियर

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनी संयुक्तपणे निर्मित 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाचा आयनॉक्स चित्रपटगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रीमियर शो झाला. या 'प्रीमियर शो'साठी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक वर्षा आंधळे, आदी उपस्थित होते. हा माहितीपट पंढरपूर वारीची प्रत्यक्ष अनुभूती देतो. या चित्रपटागृहामध्ये जणू काही पंढरपूरची वारी प्रत्यक्षात उतरली असल्याचेही अनुभव येत असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

**थोडक्यात माहितीपट** - 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' हा २२ मिनिटांचा माहितीपट वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. या माहितीपटाचे मराठी, इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलगु, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात येत आहे. विविध भाषांमधील या माहितीपटाचे प्रसारण डिस्कव्हरी, डिस्कव्हरी एचडी, टीएलसी, टीएलसी एचडी, ॲनिमल प्लॅनेट, ॲनिमल प्लॅनेट एचडी, इन्व्हेस्टिगेशन डिस्कव्हरी (आयडी), डिस्कव्हरी सायन्स, डिस्कव्हरी टर्बो अशा ९ वाहिन्यांवरुन करण्यात येत आहे.



# विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य; जैन टॅग ग्रुपचा मोफत जादू प्रयोग उपक्रम गाजला



छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) - नवजीवन स्कूल व पी. यू. जैन स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी आगळावेगळा उपक्रम सामाजिक उत्तरदायित्व जपत जैन ग्रुप तर्फे नवजीवन स्कूल व पी. यू. जैन स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत जादू प्रयोग आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व शाळा प्रशासनाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धपणे कार्यक्रमाचा आनंद घेतला आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व उत्साहाने संपूर्ण वातावरण भारावून गेले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जैन टॅग ग्रुपच्या अध्यक्षा जयश्री लोहाडे यांच्या नेतृत्वाखाली प्रोजेक्ट कमिटी, रचना पहाडेकीर्ती पाटनी मिताली काला सारीका बडजाते दिपाली पाडे सपना पाटनी कोअर कमिटी अणुपमा दगडा दिपीका बडजाते आणि ग्रुपच्या सर्व २५ सदस्यांनी मोलाचे योगदान दिले.

जैन टॅग ग्रुपतर्फे दोन्ही शाळांचे संस्थापक, विश्वस्त, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी आणि सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# साधना विठ्ठलाची; विठ्ठल करी भक्ताशी संवाद



पंढरी म्हणजे तूमचे घर,
इंद्रायणी तूमची आई
तुम्हिच माझे लेकर सगळी,
आम्ही माय बाप विठ्ठल रखुमाई...

हारा नको फुल नको मला,
भक्तानो नको सोन्याची आरास
कचरा करु नका स्वच्छता राखा,
हाच मला तुमचा प्रिय सहवास ...

हातात टाळ मुखी नाम,
अंतरी ठेवा प्रेमाची शिदोरी
स्वच्छ वारी निमर्ळ पंढरी,
अशी घडेल माझी खरी पाई वारी...

जिथे होय स्वच्छतेची पुजा, तिथेच माझा कायम सहवास
जिथे सेवेत भक्ती फुलते, तिथेच भक्ताचे पुर्ण होती ध्यास...

एकच संकल्प माझ्या वारकरी, परम भक्तानी अखंड करावा
कचरा मोहीम सदैव सुरू ठेवा, ध्यान मनी स्वच्छता चा धरावा...



याच वचणी भक्तानो विठ्ठल दर्शन,
याच कृतीतून माय बापाची माया
तुम्हीच तुम्ही भक्तानो लेकरे
सारी, आम्ही तुमचे जगतमाऊली
श्रीविठूराया..

साधना म्हणे ऐका रे भक्तानो,
माझ्या विठ्ठलाची अमृत वाणी
स्वच्छतेत दडली आहे कृतित,
भक्ताची ही खरी कहाणी...

**- सौ. साधना अशोक घुगे परभणी, केहाळकर**

# गंगापूर धरणाच्या पाणी साठ्यात वाढ; नाशिकवरील पाणी कपात टळणार ?

नाशिक, दि. १० (प्रतिनिधी) - नाशिकमध्ये गेल्या दोन दिवसांच्या कधी संततधार तर कधी मुसळधार पावसामुळे नाशिक शहरासह संपूर्ण जिल्ह्याची बुधवारी चांगलीच तारांबळ उडाली. नसिक शहरातील अनेक पूल पाण्याखाली गेले होते , अनेक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. अनेक ठिकाणी रस्ते खचल्याने आणि खड्ड्यांमुळे वाहनधारकांचे चांगलेच हाल झाले तसेच ठिकठिकाणी वाहतूक कोंडीही झाली.

दरम्यान , शहरात झालेल्या पावसामुळे नाशिकला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात वाढ झाली आहे. शहरासह जिल्ह्यातील धरणांच्या पाणीसाठ्यात देखील मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यामुळे नाशिक शहरासह जिल्ह्यातील काही तालुक्यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे नाशिकवरील पाणीसंकट टळण्याची शक्यता आहे.

# राजपूत/परदेशी समाजाचे जेष्ठतम सदस्य बंकटसिंग बिसनसिंग डुमाले(राजपूत) यांचे९३व्या वर्षी निधन



वैजापूर दि.१० (प्रतिनिधी)- येथील राजपूत-परदेशी समाजाचे जेष्ठतम सदस्य बंकटसिंग बिसनसिंग डूमाले(राजपूत)यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी राहत्या घरी वृद्धापकाळाने शुक्रवार(ता,१०)रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी चार वाजता येथील अमरधाम मध्ये अंतिम संस्कार करण्यात आले. त्याना समाजाचे जेष्ठ नागरीक धोंडीरामसिह राजपूत, विजयसिंह राजपूत ,शरद राजपूत, सचिन राजपूत, राजू राजपूत चहावाले, सागर राजपूत यांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या मागे पत्नी ,दोन विवाहित मुलगे, व एक विवाहित मुलगी,सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्राचार्य राजू शिवसिंग कहाटे यांचे ते सासरे होते.

# वर्ष २०४७ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र हरित महाराष्ट्र करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करा -जिल्हाधिकारी विनय गौडा जी सी




वैजापूर दि.१० (प्रतिनिधी)- पृथ्वीचे वाढते तापमान, पर्यावरणाचा ढासळत असलेला समतोल, व पावसाचे कमी होत असलेले प्रमाण या सर्व बाबींवर मात करण्यासाठी जास्तीत जास्त वृक्षारोपण करून शासनाचे लक्ष वर्ष २०४७पर्यत हरित महाराष्ट्र करण्यासाठी जास्तीत जास्त वृक्षारोपण करण्यासाठी सर्वांनीच सर्वंकष प्रयत्न करून जास्तीत जास्त झाडे लावून त्यांचे संरक्षण,संगोपन व संवर्धन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी सी यांनी शुक्रवार(ता,१०)रोजी नगर पालिकेच्या आरक्षण क्र,११४येथे हरित महाराष्ट्र अभियान अंतर्गत वृक्षारोपण करून 'हरित महाराष्ट्र अभियान'आरंभ केले.उपस्थित असलेल्या शालेय विद्यार्थ्यांना व एन. सी.सी ,छात्र तसेच नागरिकांना आपल्या घरासमोर किंवा जागा असेल तेथे वृक्षारोपण करून त्यांचे संरक्षण ,संवर्धन, संगोपन करण्याचे आवाहन ही विनय गौडा यांनी केले.

अध्यक्षस्थानी पालिकेचे नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी होते.त्यांनी ही सर्व नगरसेवक व कर्मचारी वृक्षारोपण करतील असे आश्वासित केले . उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख यांच्या सह उपविभागीय दंडाधिकारी डॉ.अरुण जऱ्हाड,तहसीलदार सुनील सावंत यांची उपस्थिती होती. आपल्या प्रास्तविकात मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत यांनी विशद केले की,या एकर जागेवर १६हजार झाडे लावण्याचे उद्धिष्ट आहे.शहरात विविध ठिकाणी ६०हजार वृक्ष लागवड केल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रम सूत्र संचलन नगर पालिका स्वच्छतादूत व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले.या प्रसंगी नगर सेवक सर्वश्री,राजुसिंह राजपुत,संजय बोरनारे ,उल्हास ठोंबरे,विशाल संचेती,दशरथ बनकर,राजेश गायकवाड,प्रशांत कंगले,प्रकाश चव्हाण,राजेश गायकवाड, ताहेर सुल्तानखान,हमीद कुरेशी,पारस घाटे,सावन चौधरी, शैलेश चव्हाण, लिमेश वाणी,मेजर शिवनाथ राहणे नगरसेविका ज्योती जोशी,संगीता राजपूत, सुमैय्या बक्ष, पूजा त्रिभुवन, लता वाणी, कविता शिंदे यांच्या सह शिक्षक,कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# उद्धव ठाकरेंच्या एकमेव महापौरांवर चाकू हल्ल्याचा प्रयत्न; स्वीय सहायकाला धक्काबुक्की, महापालिकेतील दालनातच थरार

परभणी दि.१० (प्रतिनिधी)- परभणी महापालिकेचे महापौर सय्यद इकबाल यांच्यावर चाकू हल्ला करण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपी रफिक शेख रौफ याच्याविरोधात नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी चाकूसह महापौरांच्या दालनात घुसल्याने एकच खळबळ उडाली होती. आरोपी कचरा डंपिंग बाबत दिलेल्या अर्जाची चौकशी करण्यासाठी आला होता. महापौरांच्या उत्तराने समाधान न झाल्याने त्याने दालनात गोंधळ घालायला सुरूवात केली.

शिवीगाळ करत रफिकने गोंधळ घालत शिव्याही दिल्या. महापौरांच्या दिशेने अंगावर जात असताना महापौरांचे स्वीय सहाय्यक मध्ये पडले तेव्हा आरोपीने त्यांना धक्काबुक्की करत त्यांचा चष्मा फोडला. दरम्यान, आरोपी रफिक याच्याकडे चाकू असल्याचे सुरक्षा रक्षकाने सांगितल्यामुळे या दृष्टीनेही पोलीसांनी तपास सुरू केला आहे. धमकी, धक्काबुक्की करणे व शासकीय कामात अडथळा आणल्याबद्दल रफिक रौफ याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महापालिकेच्या साफसफाई विभागाच्या कर्मचाऱ्याने नियमानुसार कारवाई केली होती. ही कारवाई मी करायला लावली, असा हल्ल्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीचा समज होता. परंतु संबंधितावर झालेली कारवाई ही नियमानुसार झाली होती. कदाचित हा राग मनात ठेवून त्याने हल्ल्याचा प्रयत्न केला असावा, अशी प्रतिक्रिया महापौर सय्यद इकबाल यांनी दिली आहे.

महापौर सय्यद इक्बाल सय्यद खाजा यांच्या दालनात घुसून गोंधळ घालणे, शिवीगाळ व धमकी देणे, महापौरांच्या स्वीय सहाय्यकास धक्का बुक्की करून त्यांचा चष्मा फोडणे तसेच शासकिय कामात अडथळा निर्माण केल्या प्रकरणी शेख रफिक शेख रौफ याच्या विरुद्ध नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी महापौरांचे स्वीय सहाय्यक रमेश बाबुराव चव्हाण (वय ५३) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुरूवारी (ता. ९) दुपारी साडे चारच्या सुमारास महापौरांच्या दालनात शेख रफीक हा कचरा डम्पिंगबाबत केलेल्या अर्जाची विचारणा करण्यासाठी आला होता. महापौरांनी संबंधित अर्जाची दखल घेतली असून आयुक्तांना भेटण्याचा सल्ला दिल्यानंतर आरोपीने संतापून मोठ्याने आरडाओरड सुरू केली. तसेच मोबाईलवर व्हिडिओ चित्रीकरण करत महापौरांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न केला.

यावेळी त्याला समजाविण्यास गेलेल्या स्वीय सहाय्यक रमेश चव्हाण यांना धक्का बुक्की करून त्यांचा चष्मा फोडला आणि 'येथे कोणालाही काम करू देणार नाही', अशी धमकी दिली. दरम्यान, दालनातील कर्मचारी आणि सुरक्षारक्षकांनी आरोपीला पकडून पोलीसांच्या ताब्यात दिले. तसेच आरोपीकडे चाकू असल्याची माहिती सुरक्षा रक्षकाकडून मिळाल्याचेही फिर्यादीत नमूद असून, त्याबाबतही तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक कमल विश्वनाथ शिंदे करीत आहेत.

# नशामुक्त व बालविवाहमुक्त छत्रपती संभाजीनगर

## ३१ जुलैपर्यंत राबविणार जनजागृती मोहिम; सोमवारी प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत नशामुक्त व बालविवाहमुक्त छत्रपती संभाजीनगर पंधरवाडा राबविण्यात येणार आहे. पोलीस, शिक्षण, महिला बालकल्याण इ. विभागही या मोहिमेत सहभागी होणार असून सोमवार दि.१३ पासून सुरु होणाऱ्या या पंधरवाड्यात जनजागृती करण्यात येणार आहे. शुक्रवार दि.३१ जुलै पर्यंत हे अभियान राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेचे उद्घाटन सोमवार दि.१३ रोजी मंथन सभागृह, एमआयटी कॉलेज, बीड बायपास रोड येथे सकाळी साडेदहा वा. होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे हे राहणार असून अध्यक्षस्थानी महापौर समीर राजूरकर, प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हे राहणार आहेत.यावेळी महापालिकेचे आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अध्यक्ष मिन्नू पी.एम., पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क अभिनव बालुरे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, प्रादेशीक उपायुक्त डॉ. दीपक खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, शिक्षणाधिकारी (माध्य.) आश्विनी लाठकर, पोलीस उपअधीक्षक (अंमलीपदार्थ विरोधी टास्क फोर्स) साईनाथ ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थितीचे आवाहन जिल्हा समाजकल्याण अधिकारी बाबासाहेब अरवत, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कोमल कोरे, नशामुक्त भारत अभियान जिल्हा समिती सदस्य विलास चंदने यांनी केले आहे.

# पात्र ओटे व गाळे धारक यांना लवकरात लवकर भाजी मंडई येथे जागा देण्यात येणार-सभापती



छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील संभाजीपेठ येथे सावित्रीबाई फुले भाजी मंडई विकसित करण्यात येत आहे.१४ वर्षानंतर ही भाजी मंडई पुन्हा सुरू होत आहे.

महापालिकेच्या वतीने दि.०१ ते ०४ जुलै या कालावधीत ओटे व गाळे धारक यांच्या कडून आवश्यक ते कागदपत्रे मागविण्यात आली होती.यात प्रामुख्याने गाळे वाटप पत्र,पैसे भरल्याच्या पावत्या,करारनामा,न्यायालयाचा आदेश,काही न्याय प्रविष्ट प्रकरण असेल तर त्याची प्रत,आधार कार्ड , पॅन कार्ड आदी कागदपत्रे मागविण्यात आली होती.

महापालिकेच्या मालमत्ता विभागात दाखल झालेल्या कागदपत्रांची छाननी सुरू असून पात्र ओटे व गाळे धारक यांचे कडून रीतसर शुल्क भरून घेण्यात येत आहे. आजस्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी स्वतः या ठिकाणी भेट दिली व ओटे व गाळे धारक यांच्याशी सविस्तर चर्चा केली.त्यांना काही अडचणी आहेत का याबद्दल माहिती घेतली. त्यांनी या सर्व नोंदणी प्रक्रियेची पाहणी केली व याबाबत संबंधित अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. आज एकूण ओटे धारक यांचे प्राप्त ३४ अर्ज व गाळे धारक यांचे ३२ अर्ज यांच्या कागदपत्रांची शहानिशा करून हे अर्ज अंतिम करण्याची प्रक्रिया सुरु आहे.. यानंतर रीतसर शुल्क भरून घेण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे अशी माहिती मालमत्ता विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.तसेच मां.सभापती अनिल मकरिये व मां.आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार उद्या दि.११ जुलै शनिवार रोजी सुध्दा मालमत्ता विभाग सुरू राहणार असून लाभार्थी आपले अर्ज दाखल करू शकतात. यावेळी सभापती महोदयांनी लाभार्थी यांचे कडून स्वतः अर्ज स्वीकारले. या पाहणी वेळी उप आयुक्त अपर्णा थेटे,सहायक आयुक्त संजय चामले, ओटे व गाळे धारक यांची उपस्थिती होती.

# कन्नड येथे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.यांनी घेतला मतदार यादी विशेष सखोल पुन:रीक्षण कामाचा आढावा

## १०० टक्के काम पूर्ण केलेल्या बीएलओचा सत्कार




छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज कन्नड तालुक्यातील मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनःरीक्षण (एस आय आर) कामाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच एस आय आर चे शंभर टक्के कार्य पूर्ण करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी एल ओ)यांचा सत्काराही त्यांनी केला. उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार श्रीमती सारिका भगत तसेच इतर तालुका स्तरीय अधिकारी यांची यावेळी उपस्थिती होती.

एस आय आर चे १०० टक्के काम पूर्ण करणारे मतदान केंद्र क्रमांक १८४,३२५,२७९ येथील बी एल ओ यांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हाधिकारी गौडा यांनी कन्नड तालुक्यातील अंधानेर येथील जिल्हा परिषद शाळेस भेट देऊन एस आय आर कामाचा आढावा घेतला. तसेच वृक्षारोपण केले सोबतच येथे असणाऱ्या घनदाट वन येथे ही भेट दिली, मुंडवाडी येथे असणाऱ्या आदर्श शेतकरी तेजराव बारगळ संचलित अंकुर रोपवाटिकेसही त्यांनी भेट दिली. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना संजय गांधी निराधार योजनेचे मंजुरी पत्र त्यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

औराळा भागातही जिल्हाधिकारी गौडा यांनी बी एल ओ यांची भेट घेऊन एस आय आर कामाची गती वाढवावी यासाठी मार्गदर्शन केले.

## (पान १ वरुन)

### शेख हसीना बांगलादेशात परतणार,...

काबीज केल्यानंतर २०२४ मध्ये त्यांच्याविरोधात विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडले. या आंदोलनामुळे ऑगस्ट २०२४ मध्ये शेख हसीना यांना देश सोडून पलायन करावे लागले होते. यावेळी बांगलादेशमधील न्यायालयाने त्यांना फाशीची शिक्षा सुनावली होती. हसीना यांनी आपल्यावरील आरोप वारंवार फेटाळून लावले आहेत.

शेख हसीना मुलाखतीत पुढे म्हणाल्या, मी कारावासाच्या शिक्षेला घाबरत नाही. मी यापूर्वीही तुरुंगात गेलेली आहे. जर माझ्या सरकारकडून काही चुका झाल्या असतील तर त्याचा निर्णय न्यायालय किंवा विरोधी पक्ष नाही तर जनता घेईल. जेव्हा एखादे सरकार दीर्घकाळ सत्तेत राहते, तेव्हा त्यांच्याकडून काही चुका होतात. मात्र त्या सरकारने काय चांगले केले आणि काय चुकीचे केले, याचा निर्णय जनता घेईल.

### आमची अन् काँग्रेसची विलीनीकरणासंदर्भात...

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, अजित पवार आम्हाला सोडून जेव्हा एनडीएमध्ये गेले त्यावेळी अवघ्या १७ दिवसांमध्ये उद्धव ठाकरे आणि त्यांच्या टीमने त्यांची भेट घेतली होती हे वास्तव आहे. त्यावेळी आम्हाला ते काही गैर वाटले नाही. आम्ही ते सर्व काही सांभाळून घेतले. सशक्त लोकशाहीमध्ये संवाद असलाच पाहिजे हे आमचे मत आहे तसे संस्कार यशवंतराव चव्हाण यांनी आमच्यावर केले आहेत.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, एकनाथ शिंदे यांच्यासोबत शरद पवार यांची काही बैठक झाली नाही. शरद पवार हे विधानभवनात गेले त्यावेळी काही आमदारांनी त्यांच्याशी चर्चा करायची असे म्हटल्याने सर्वात जवळ एकनाथ शिंदेंचे कॅबिन होते तिथे शरद पवार गेले आणि आमदारांची चर्चा केली. योगायोगाने ते कॅबिन एकनाथ शिंदे यांचे निघाले. कॅबिनेट सुरू असताना शिंदे खाली आले त्यांनी शरद पवारांशी दोन मिनिटे चर्चा केली आणि पुन्हा ते बैठकीला गेले. याबद्दल मी संजय राऊत यांना फोन करत माहिती दिली. कोणीतरी राऊत यांना चुकीची माहिती दिली त्यामुळे राऊत तसे बोलले असावे.

### फडणवीस-तुपकर बैठकीत...

मुंबईतील आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र काल गुरुवारी नियोजित बैठक होऊ शकली नाही. या परिणामी तुपकरांना काल रात्री आपल्या पदाधिकाऱ्यांसह आझाद मैदान पोलीस ठाण्यात मुक्काम करावा लागला. गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीने अखेर आज शुक्रवारी दुपारी ही बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री गिरीश महाजन आणि रविकांत तुपकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तुपकर यांच्या शिष्टमंडळामध्ये ॲड. शर्वरी सावजी-तुपकर, 'क्रांतिकारी'चे प्रदेशाध्यक्ष राजकुमार कसबे, युवा प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण मोरे, मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे उपस्थित होते. जवळपास पाऊण तास सविस्तर बैठक पार पडली. मुख्यमंत्री आणि तुपकर यांच्या शिष्टमंडळात निर्णायक चर्चा झाली.

### अजितदादांच्या विमान अपघात प्रकरणाचा...

करत आहे. एएआयबीचा अहवाल महत्त्वाचा आहे, त्यानंतर पुढे तपास होणार आहे. सीआयडी तपासानुसार पायलट सुमित कपूर यांच्यावर शंका होती, त्यांचे सर्व बँक खाते तपासले, पण त्याच संशयास्पद आढळले नाही. ब्लॅक बॉक्समधील सर्व माहिती घेतली आहे. जेवढे डाऊनलोड करायचे ते डॉक्युमेंट डाऊनलोड झाले आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

एएआयबीचा अहवाल सर्वात महत्त्वाचा आहे. रोहित पवारांनी सांगितले की, तीन-चार वर्ष लागतात. हे खरे आहे. परंतु, या प्रकरणात विशेष करून केंद्र सरकारने विनंती केली आहे. परदेशातील सगळे तज्ज्ञ यात घेतलेले आहेत. अमेरिकेतील एक संस्था यावर काम करत आहे. त्यांना केलेली विनंती मान्य करण्यात आली आहे. म्हणून असे म्हणू नये, पण दादांची पुण्यतिथी येईल, त्या अगोदर हा अहवाल यावा, अशा प्रकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. तसेच हा अहवाल आल्यानंतर सीआयडी असेल किंवा सीबीआय असेल, तपास करतील. कारण विमानात काय घडले, ते या अहवालाशिवाय समजूच शकत नाही. सगळे धागेदोरे यातच मिळणार आहेत, असेही फडणवीसांनी नमूद केले.

### एक पैशाचा धोका झाला नाही, मिसिंग...

देखील कमी, ही वस्तुस्थिती असल्याचे ते म्हणाले. या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे ४० मिनिटांनी अंतर कमी झालं. पुढचं सातारा, तुमचं कोल्हापूर सगळंच पश्चिम महाराष्ट्रामध्ये हा गेम चेंजर प्रकल्प आहे. दर दिवशी एक कोटी रुपयांचं इंधन वाचतंय, प्रदूषण वाचतंय, वाहतूक कोंडी वाचते आहे असे शिंदे यांनी सांगितले. शिंदे पुढे म्हणाले, मागे अटल सेतूच्या बाबतीमध्ये असच केलं, अटल सेतू उखडला, अरे काय होतं, सर्विस अप्रोच रोडला एक भेग पडली होती. आज अटल सेतूवर ३० हजारांपेक्षा जास्त वाहनं ये-जा करतायत. मुंबईत रस्त्यांची एकूण लांबी २,०५० किलोमीटर आहे. मेगा सीसी रोड प्रकल्पांतर्गत आतापर्यंत ५७५ किलोमीटर काम पूर्ण झालं आहे. हे पूर्ण झाल्यानंतर शहरामध्ये १,९१३ किलोमीटर काँक्रीटचे रस्ते असतील. काँक्रिटीकरणामुळे दरवर्षी खड्डे दुरुस्तीवर होणारा खर्च कमी झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रतिबंधित प्लॅस्टिक पाठवणाऱ्या अहिल्यानगरच्या व्यापाऱ्याला २५ हजारांचा दंड!; महानगरपालिकेची कारवाई

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रतिबंधित प्लास्टिक विरोधात आपली धडक मोहीम सुरूच ठेवली असून, आज एका आंतरजिल्हा कारवाईत यशस्वी कामगिरी केली आहे. जिल्हा अहिल्यानगर येथील एका प्लास्टिक दुकानदाराने छत्रपती संभाजीनगरमध्ये पाठवलेले ५० किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करत मनपाने संबंधिताला २५,००० रुपयांचा मोठा दंडात्मक इंगा दाखवला आहे.

महानगरपालिकेचे 'नागरिक मित्र पथक' शहरात गस्त घालत असताना पथकाला गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने छत्रपती संभाजीनगर येथील 'आरको ट्रान्सपोर्ट' च्या गोदामावर तातडीने छापा टाकला. या तपासणी दरम्यान, जिल्हा अहिल्यानगर येथील 'व्यंकटेश डिस्पोजल अँड पॅकेजिंग' या दुकानातून आलेले एक पार्सल संशयास्पद आढळले. सदर पार्सल उघडून पाहिले असता, त्यात तब्बल ५० किलो वजनाचे पूर्णपणे प्रतिबंधित असलेले प्लास्टिक आढळून आले.

नियमभंगाचा तपशील स्पष्ट होताच, मनपा पथकाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'क्लीन स्ट्रीट्स ॲप्लिकेशन' द्वारे घटनास्थळावरूनच थेट अहिल्यानगरच्या 'व्यंकटेश डिस्पोजल अँड पॅकेजिंग' या मूळ मालकाला ऑनलाइन दंडात्मक पावती जारी केली. मनपाच्या या तत्पर कायदेशीर कारवाईनंतर संबंधित दुकानदाराने २५,००० रुपयांचा दंड ऑनलाइन पद्धतीने त्वरित भरला. जप्त केलेले ५० किलो प्लास्टिक स्क्रॅप करून नष्ट करण्याची प्रक्रिया मनपाकडून करण्यात आली आहे.

सदर धडक कारवाई मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या थेट देखरेखीखाली पार पडली. या कारवाईत नागरिक मित्र पथकाचे प्रमुख देविदास सुसर, सुवर्णसिंग परदेशी, बालाजी साबळे, जनार्दन सांगळे आणि जवान आनंद चावरिया यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. छत्रपती संभाजीनगर शहराला प्लास्टिकमुक्त आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी मनपाची ही मोहीम यापुढेही अत्यंत तीव्रतेने सुरूच राहणार आहे. शहर परिसरातील नागरिक, स्थानिक किरकोळ विक्रेते आणि विशेषतः घाऊक व्यापाऱ्यांना महानगरपालिकेतर्फे कडक सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी प्रतिबंधित प्लास्टिकचे उत्पादन, वितरण, विक्री किंवा वापर पूर्णपणे थांबवावा. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही अशीच मोठी दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**INVITATION FOR BIDDING (IFB)**
**E-TENDER (RFx) NOTICE**

Notice for submission of online bids (RFx) for following

| S.N. | RFx/Tender No. & Description |
| --- | --- |
| 1 | RFx No. 7000040186(Second Call) Work of overhead termination arrangement of Hybrid Bay at 132 kV Chikalthana S/S for termination of 132kV Shendra-Chikalthana monopole Line. Rfx No 7000040186. Estimated Cost: Rs. 1,62,26,377/- Only (Including GST & Labour cess) EMD- Rs. 1,62,263.77/- Tender Fees:- Rs.5000/-(Including GST) Contact No: Executive Engineer (8554995266) Last Date of Submission - 20.07.2026. |

For further details, visit our Website
https://srmetender.mahatransco.in

Chief Engineer EHV PC & O&M Zone MSETCL
Chhatrapati Sambhajinagar

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**सर्वसाधारण सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (०७)**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' चे प्रकरण-२ मधील नियम क्र. १ (ह) आणि (आय) अन्वये**

दिनांकः- ०६.०७.२०२६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' चे प्रकरण-२ मधील नियम क्र. १ (क) अन्वये मा.महापौर श्री. समीर सुभाष राजूरकर यांनी मंगळवार दिनांक **१४.०७.२०२६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०७ रोजी सकाळी ११.०० वाजता** छत्रपती संभाजीनगर महापालिकेतील प्रशासकीय इमारतीतील **'प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह** येथे आयोजित केली आहे. प्रायोजित सभेत निम्ननिर्दीष्ट विषय निर्णयाधीन आहेत.

**इतिवृत्तांत कायम करणे.**

**विषय क्रमांक ४८ :-**
दि. १०.०२.२०२६ (का.प.क्र.०१), दि.०५.०३.२०२६ (का.प.क्र.०२), दि.२७.०३.२०२६ (का.प.क्र.०३) दि. २०.०४.२०२६ (का.प.क्र.०४) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**महानगरपालिका आयुक्तांकडून आलेले प्रस्ताव**

**विषय क्रमांक ४९:-** **(शहर अभियंता विभाग)**
पहाडसिंगपुरा येथील सैनिक कॉलनी ते शेळके शॉप पर्वतच्या रस्त्या अंतर्गत आर. सी. सी. ट्रेन ऐवजी १००० मीमी व्यासाची NP-II पाईप टाकणे.

**विषय क्रमांक ५० :-** **(एन.यू.एल.एम विभाग)**
शहरी पदविक्रेता समिती निवडणूक प्रक्रिया राबविणेसाठी मनपाच्या २०२६-२७ च्या सुधारित अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध करणे.

**विषय क्रमांक ५१:-** **(मालमत्ता कर विभाग)**
मनपाच्या हद्दीत सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करणे व नियम २१ नुसार नवीन आकारणी पुस्तक तयार करुन घेणेसाठी खाजगी अभिकर्ता नियुक्त करणे,

**विषय क्रमांक ५२:-** **(आरोग्य विभाग)**
किटकजन्य साथरोग प्रतिबंधात्मक उपाय योजना राबविण्या साठी डास अळीनाशक, किटकनाशक औषधी ई-निविदा पध्दतीने महाटेंडरवर खरेदी करणे.

**स.पालिका सदस्यांकडून आलेले प्रस्ताव**

**विषय क्रमांक ५३:-**
सातारा परिसरातील एस.आर.पी.एफ. रोड वरील पेशवे नगर चौकाला देशभक्त चापेकर बंधु चौक' असे नाव देणे
सुचकः-श्रीमती सविता रत्नाकर कुलकर्णी — अनुमोदकः-श्री. राजपुत पद्मसिंग काशीनाथ

**विषय क्रमांक ५४:-**
पेशवे नगर, एस.आर.पी.एफ. रोड सातारा परिसर येथील चौकास 'तुकामाई चौक' असे नाव देणे.
सुचकः-श्रीमती सविता रत्नाकर कुलकर्णी — अनुमोदकः-श्री. राजपुत पद्मसिंग काशीनाथ

**विषय क्रमांक ५५:-**
सातारा परिसर येथील बेंबडे हॉस्पीटल ते धुळे सोलापुर कडे जाणाऱ्या मार्गास 'धर्मवीर आनंद दिघे मार्ग व जैस्वाल यांच्या घरासमोरील चौकास 'धर्मवीर आनंद दिघे चौक' असे नाव देणे,
सुचकः-श्री. सिध्दांत संजय शिरसाट — अनुमोदकः-श्रीमती श्वेता सुमित त्रिवेदी

**विषय क्रमांक ५६:-**
सातारा परिसर येथील राधा मंगल कार्यालय समोरील चौकास 'राजे यशवंतराव होळकर चौक' असे नाव देणे.
सुचकः-श्री. सिध्दांत संजय शिरसाट — अनुमोदकः-श्रीमती श्वेता सुमित त्रिवेदी

**विषय क्रमांक ५७:-**
औद्योगिक केंद्र भागातील कामगार रहिवासियांना मनपाकडून पी. आर. कार्ड देण्याकरीता महाराष्ट्र राज्य सरकार यांना प्रस्ताव पाठविणे.
सुचकः-श्री. बालाजी दिनकर मुंडे, श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड — अनुमोदकः-श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे, श्रीमती सुरेखा ताराचंद गायकवाड

**विषय क्रमांक ५८:-**
आमखास मैदान ते आरेफ कॉलनी या मुख्य रस्त्यावर सुयोग्य ठिकाणी आकर्षक प्रवेशद्वार उभारणे.
सुचकः-श्रीमती फरजाना शेख गुलाम रसुल — अनुमोदकः-श्री. अब्दुल समीर साजीद

**विषय क्रमांक ५९:-**
भीमनगर येथील २२ गुंठे जमीनीवर नागरीकांच्या सुविधेसाठी सुसज्ज दोन मजली दवाखाना बांधणे.
सुचकः-श्री. अफसर खान यासीन खान — अनुमोदकः-श्री. अमित सुधाकर भुईगळ

**विषय क्रमांक ६०:-**
संजयनगर ते बायजीपुरा या रस्त्यास 'डॉ. जफर अहमद खान मार्ग' असे नाव देणे.
सुचकः-श्री. गोविंद परशुराम केंद्रे — अनुमोदकः-श्री. किशोर बाबुराव नागरे, श्री. खान फेरोज मोइनउद्दीन खान, श्री. अब्दुल समीर साजेद,

**विषय क्रमांक ६१:-**
मिटमिटा येथील तीसगावकडे जाणाऱ्या चौकास 'राष्ट्रपुरुष शहिद भगतसिंग चौक' नाव देऊन नामफलक लावणे.
सुचकः-श्री. गणेश कौतीकराव लोखंडे — अनुमोदकः-श्रीमती सावित्रीबाई हिरालाल वाणी

**विषय क्रमांक ६२:-**
प्रभाग क्र. ०४ अंतर्गत मोजे मिटमिटा शिवारातील अप्पावाडी परिसरास 'महात्मा बसवेश्वर नगर' असे नाव देणे.
सुचकः-श्री. गणेश कौतीकराव लोखंडे — अनुमोदकः-श्रीमती सावित्रीबाई हिरालाल वाणी

**विषय क्रमांक ६३:-**
मनपाच्या हद्दीतील विजेता खेळाडूंस सत्कार व आर्थीक मदत देण्याची प्रथा सुरु करणे.
सुचकः-श्री. अब्दुल मतीन खान मस्तान खान — अनुमोदकः-श्री. शेख साबेर पाशु

**विषय क्रमांक ६४:-**
नगर भुमापन सर्व्हेक्षण योजने अंतर्गत मिळकतधारकांना त्यांच्या मिळकतीची सनद तयार झाल्यानंतर त्यांची किंमत मिळकत धारकांकडून वसुल करुन ते मनपास वर्ग होईल या योजनेवर होणारा खर्च मनपास फंडातून करणे किंवा मनपा निधी उपलब्ध नसल्यास शासनाकडून विशेष बाब म्हणुन विशेष निधीची मागणी करणे.
सुचकः-श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे — अनुमोदकः-श्रीमती छाया विजय वाघचौरे

**विषय क्रमांक ६५:-**
चौकास 'कै. संजयसिंग (नाईक) चव्हाण चौक' असे नाव देणे. गारखेडा अंतर्गत जानकी हॉटेल ते रेणुकानगर कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यास 'डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन मार्ग' व मेहरसिंग नाईक शाळे समोरील
सुचकः-श्री. गोविंद परशुराम केंद्रे — अनुमोदकः-श्री. रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य, श्रीमती दया कैलास गायकवाड, श्रीमती सुनिता संजय सोळंके

**विषय क्रमांक ६६:-**
शहरातील परवानाधारक देशी दारुची दुकाने, बीयरबार हे मनपाच्या हद्दी बाहेर स्थलांतरीत करण्याची कार्यवाही प्रशासना तर्फे करणे.
अनुमोदकः-श्री. मुन्शी भिकन शेख — सुचकः-श्री. अब्दुल समीर साजीद

**विषय क्रमांक ६७:-**
प्रभाग क्र. २८, हमालवाडा अंतर्गत मनपाच्या खुल्या जागेवर सभागृह विकसित करणे.
अनुमोदकः-श्रीमती नुर जहान इकबाल — सुचकः-श्रीमती नसीम बेगम मोहम्मद अफसर

**विषय क्रमांक ६८:-**
खडकेश्वर येथील वाचनालयाच्या ठिकाणी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांचे स्मारक, पुतळा, वाचनालय, सभागृह आणि अभ्यासिका (लायब्ररी) नवीन बांधकाम करणे.
सुचकः-श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे — अनुमोदकः-श्री. अनिल श्रीकिशन मकरिये, श्री. ऋषिकेश प्रदिप जैस्वाल, श्री. अशोक धोंडिबा दामले

**विषय क्रमांक ६९:-**
विख्यात कवी व माजी खासदार 'स्वर्गीय श्री. काझी सलीम' यांच्या स्मरणार्थ दरवर्षी अधिकृत स्वरुपात 'एक शाम श्री. काझी सलीम के नाम' मुशायरा व कवी संमेलन आयोजित करणे व आवश्यक आर्थिक तरतुद मनपाच्या वार्षिक अंदाजपत्रकात समाविष्ट करणे.
सुचकः-श्री. मोहम्मद वसीम अलीम अहेमद — अनुमोदक :- श्री. काकासाहेब दामोधर काकडे

**विषय क्रमांक ७०:-**
एन-६ संभाजी कॉलनी परिसरातील द-वर्ड-इंग्लिश स्कुलकडून थकीत भाडे वसुल करुन मनपाच्या ताब्यात घेणे तसेच ही इमारत पाडून या ठिकाणी सी.बी.एस.ई. माध्यमाची शाळा सुरु करणे.
सुचकः-श्रीमती मीना नितीन खरात — अनुमोदकः-श्री. शिवाजी भाऊसाहेब दांडगे, श्रीमती माधुरी मिलींद देशमुख (अदवंत), श्री. मयुर बन्सीलाल वंजारी

**विषय क्रमांक ७१:-**
प्रभाग क्र. १२,१३ व १४ अल्तमश कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेवर सुसज्ज व प्रशस्त मंगल कार्यालय उभारणे.
सुचकः-श्री. सय्यद उसामा अब्दुल कदीर, श्री. अब्दुल समीर साजिद — अनुमोदकः-श्री. शेरखान हाजी अब्दुल रहेमान खान, श्री. मुन्शी भिकन शेख

**विषय क्रमांक ७२:-**
प्रभाग क्र. ११, एन-८, पी-५, विनायक गृहनिर्माण संस्था येथील उद्यानास 'सिध्दि विनायक उद्यान' असे नाव देणे.
सुचकः-ॲड. माधुरी मिलींद देशमुख-अदवंत, श्री. विश्वनाथ गुरुलिंग स्वामी
अनुमोदकः-श्रीमती मयुर बन्सीलाल वंजारी, श्रीमती मीना नितीन खरात

**विषय क्रमांक ७३:-**
प्रभाग क्र.२० अंतर्गत इंदिरानगर येथील परिसरात असलेल्या मनपाच्या मोकळ्या जागेत मनपाच्या मालकीची शाळेची इमारत बांधणे.
सुचकः-श्रीमती अनिता किशोर मानकापे — अनुमोदकः-श्री. जालिंदर महादेव शेंडगे

**विषय क्रमांक ७४:-**
नारेगाव, राजेंद्रनगर या भागात मनपाची ओपन स्पेस जागेस 'श्री संत सेवालाल महाराज चौक' असे नाव देणे.
सुचकः-श्रीमती मोहिनी लक्ष्मण गायकवाड — अनुमोदकः-श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड

**विषय क्रमांक ७५:-**
नारेगाव येथील मनपाच्या आरोग्य केंद्राच्या बाजुला असलेल्या मनपाच्या जागेत आरोग्य केंद्राची इमारत नव्याने उभारणे.
सुचकः-श्रीमती मोहिनी लक्ष्मण गायकवाड — अनुमोदकः-श्रीमती भारती महेंद्र सोनवणे

**विषय क्रमांक ७६:-**
सिडको परिसरातील चिश्तीया चौक ते बळीराम पाटील विद्यालय येथील असलेल्या चारपदरी दुतर्फा रस्त्यास 'धर्मवीर मोरेश्वरजी सावे मार्ग' असे नाव देणे.
सुचकः-श्री. मयुर बन्सीलाल वंजारी — अनुमोदकः-श्री. विश्वनाथ गुरुलिंग स्वामी, ॲड. माधुरी मिलींद देशमुख-अदवंत, श्रीमती मीना नितीन खरात

**विषय क्रमांक ७७:-**
मनपाच्या मालकीची 'श्री साई नॉलेज शिक्षण संस्था' यांच्याकडून सर्व थकबाकीची वसुली करुन घेणे, इमारत पाडणे व त्या ठिकाणी मनपामार्फत मराठी व इंग्रजी (सी.बी.एस.ई.) माध्यमाची शाळा सुरु करणे.
सुचकः-श्री. मयुर बन्सीलाल वंजारी — अनुमोदकः-श्री. विश्वनाथ गुरुलिंग स्वामी

**विषय क्रमांक ७८:-**
जळगाव हायवे लगत, आंबेडकर नगर जवळील, पिसादेवीकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सुचकः-श्री. विजय साईनाथ औताडे — अनुमोदकः-श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री. रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ७९:-**
जळगाव हायवे लगत हर्सल टी- पॉईट कडून मयूरपार्ककडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'श्री. खाटू श्याम बाबा प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सुचकः-श्री. विजय साईनाथ औताडे — अनुमोदकः-श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री. रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ८०:-**
जळगाव हायवे लगत उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समितीकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'राजमाता जिजाऊ माँसाहेब प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सुचकः-श्री. विजय साईनाथ औताडे — अनुमोदकः-श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री. रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ८१:-**
जळगाव हायवे लगत साई मेडीसिटी हॉस्पिटल जवळील जाधववाडीकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सुचकः-श्री. विजय साईनाथ औताडे — अनुमोदकः-श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री. रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ८२:-**
अंबिका नगर, वडाच्या झाडाकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'मा. सरपंच स्व.पै. शंकरराव पाटील औताडे प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सुचकः-श्री. विजय साईनाथ औताडे — अनुमोदकः-श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री. रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ८३:-**
जळगाव हायवे लगत जाधववाडी सिंग्नल कडून सुरेवाडीकडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रवेशद्वार' असे नाव देणे.
सुचकः-श्री. विजय साईनाथ औताडे — अनुमोदकः-श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री. रामदास पंडितराव हरणे

**विषय क्रमांक ८४:-**
जळगाव हायवे लगत SBOA चौक येथून मयूरपार्ककडे जाणाऱ्या प्रवेशद्वारास 'हिंदवी स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार' असे नाव देणे.
अनुमोदकः-श्रीमती भारती महेंद्र सोनवणे, श्री. रामदास पंडितराव हरणे — सुचकः-श्री. विजय साईनाथ औताडे

स्वाक्षरीत/-
**नंदकिशोर भोंबे**
**महापालिका सचिव**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.**